# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price Rs. 3/-

# संवाद

**मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥**
**सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥**

॥ स्वयमेव मृगेंद्रता ॥

**Vol.-1** **Issue - 7** जानेवारी २००९ **January 2009**


**Mumbai Zonal Sub-Centre**

Please read the Notice of Mumbai Zonal Sub-centre's 22nd Annual General Meeting printed on Page No.3. Please note that no separate Notice of the AGM will be sent to the members.

**मुंबई सब्-सेंटरच्या सभासदांसाठी विशेष सूचना**

पान क्र.३ वर मुंबई सब्-सेंटरच्या २२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस छापली आहे. या सभेची वेगळी नोटीस सभासदांना पाठवली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

## Hearing of Delhi High Court case started on 15th Jan., 09

## j संपादकीय

सभासद मित्रांनो,

२००९ चा वर्षारंभाचा हा अंक मात्र आपणास महिना अखेरीस मिळत असला तरी सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा.

२००८ साल काळाच्या उदरात कायमचे गडप झाले. काही घटना अभिमानास्पद घडल्या तर काही उद्वेगजनक आणि संतापजनकही. बिजिंग ऑलिंपिकमधील सुवर्णपदकाच्या प्राप्तीने क्रीडाक्षेत्रात नवा उत्साह निर्माण झाला, तर चान्द्रयानाच्या यशस्वी उड्डाणामुळे भारतीय वैज्ञानिक केवढी भरारी घेऊ शकतात याचे दर्शन घडले. उलट मंदीने मात्र मोठ्या जलद गतीने औद्योगिक क्षेत्रातच नव्हे अन्य क्षेत्रात हातपाय पसरले. पाठोपाठ पाकिस्तानने भारताच्या मानबिंदूंवर केलेला हल्ला. अनेक निष्पाप जीव बळी पडले. करकरे, कामटे, साळसकर यांच्यासारख्या तरुण पोलिस अधिकाऱ्यांची हत्या झाली. हा आघात होत्याचे नव्हते करून गेला. केंद्रात आणि महाराष्ट्रातही सत्तापालट झाला. केंद्रीय अर्थमंत्री म्हणून मा.पंतप्रधानांनी कारभार आपल्या हाती घेतला. महाराष्ट्रातला बदल आपणा सर्वांना ठाऊक आहे. हे सारे घडले तरी, काळाला थांबणे ठाऊक नसते. गेला तो भूतकाळ आणि आला तो प्राप्तकाळ. या प्राप्तकाळाकडे नवी संधी म्हणून पाहणे एवढेच. मग ते वैयक्तिक, कौटुंबिक, राष्ट्रीय जीवन कोणतेही असो. मला आठवते ती केशवसुतांची कविता-'तुतारी'. त्यात कवी म्हणतो -

''प्राप्तकाल हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयात खोदा ।
निज नामे त्यावरती नोंदा, विक्रम कांही करा चला तर ॥''

गतवर्षांचे सिंहावलोकन करताना वैयक्तिक जीवनातला आढावा घेण्यालाही महत्त्व आहे. त्या संदर्भात भागवतातील एक आश्वासक सुभाषित आठवले ते असे -

''भोगेन पुण्यं कुशलेन पापं । कलेवरं कालजवेन हित्वा ।
कीर्तिं विशुद्धां सुरलोक गीतां । विताथ मामेष्यसि मुक्तबंधः ॥''

यातील महत्त्वाचे म्हणजे भोगांच्याद्वारे सत्कर्माचे फल आणि निष्काम सत्कर्मांनी पापाचा नाश होतो. (ज्यांचा पापपुण्यावर विश्वास नाही त्यांनी कायदेशीर व बेकायदेशीर असा अर्थ केल्यास हरकत नाही.) आपल्या संघटनेत आता सारेजण साठीपलिकडचे नाहीत. काही नवनिवृत्त अजून तारुण्यातच आहे. त्यांच्या कर्तृत्वाला खूप वाव आहे. निवृत्तिवेतन हे त्यांच्यासाठी 'सोय' नसून 'संधी' आहे हे मात्र निश्चित. नवनिवृत्तांनी संघटनेच्या कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी व्हावे ही अपेक्षा तर कायमचीच आहे. शिवाय स्वत:चे म्हणून काही सार्वजनिक हिताचे उपक्रम असतील तर, 'संवाद'च्या माध्यमातून कळवावेत. अट फक्त एवढीच त्यात जाहिरातबाजी नसावी तर विधायक उपक्रमांचे दर्शन घडावे.

मित्रांनो, संपादक 'सर्वज्ञानी' कधीच नसतो. 'संवाद'चे संपादकदेखील त्याला अपवाद नाहीत. तेव्हा आपल्या अपेक्षा, प्रतिक्रिया (अगदी कटू असल्या तरी) अवश्य कळवा.

'संवाद' हे संघटनेचे केवळ मुखपत्रच नव्हे तर नेत्रपत्र, कर्णपत्र व्हायला हवे. कारण ''परस्परं भावयन्त: श्रेय: परमवाप्स्यथ ।'' (भगवद्गीता) हेच आपणास साधायचे आहे.

पुनश्च सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा.

**- श्रीधर विश्वनाथ सहस्रबुद्धे**

# स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे
## मुंबई झोनल सब्-सेंटर

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

मुंबई झोनल सब्-सेंटरची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि.१८ फेब्रुवारी २००९ रोजी दुपारी १२ वाजता 'श्री शिवाजी मंदिर नाट्यगृह', प्लाझा सिनेमासमोर, दादर (पश्चिम), मुंबई-२८ येथे आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित रहावे. या सभेत खालील कामकाज होईल.

**कार्यक्रम पत्रिका**

१) गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर ज्या मृत सभासदांची नांवे असोसिएशनला कळविली आहेत अशा सर्व मृत सभासदांना श्रद्धांजली वाहणे.

२) गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत मंजूर करणे. हा वृत्तांत 'संवाद' मासिकाच्या नोव्हेंबर २००८ च्या अंकात प्रसिद्ध केला आहे.

३) कार्यकारी मंडळाच्या २००८ सालाच्या अहवालास मंजूरी देणे.

४) २२ फेब्रुवारी २००८ ते १८ फेब्रुवारी २००९ या कालावधीत ज्या सभासदांच्या वयास ७५ वर्षे पूर्ण झालीत/होतील अशा सर्व ज्येष्ठ सभासदांचा सत्कार करणे.

५) चालू घडामोडींविषयी माहिती देणे.

६) माननीय प्रमुख पाहुण्यांचे भाषण.

७) माननीय अध्यक्षांचे भाषण.

८) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा करणे.

तसेच वर उल्लेख केलेल्या सभास्थानी दुपारी १२।। वाजता आपल्या बँकेने आयोजित केलेली 'पेन्शनरांची सभा' (Pensioners' Meet ) होईल. आवश्यकतेनुसार या पेन्शनरांच्या सभेच्या वेळेत बदल केला जाईल याची कृपया नोंद घ्यावी. तरी सभासदांनी याही सभेस उपस्थित रहावे ही विनंती. आपल्या वार्षिक सर्वसाधारण सभेची वेगळी नोटीस पाठविली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**स. ब. गोखले**
प्रमुख सेक्रेटरी

## REMAIN YOUNG AT HEART

We keep growing each passing day adding to years. Some grey hair and wrinkles upset us for the on-set of senescence. Time passes ceaselessly. Our body, a God given machine, undergoes wear and tear. But we are not shunted like other machines. Our growing old adds wisdom in us. Life's experiences enhance mellowness and maturity. A fit mind is the key of a person's overall well being. It is one's attitude towards life that matters most. A negative attitude is sure sign of old age. It shows that the person has really stopped growing in any gainful manner. It speaks of his lost faith in himself and in everybody around him. The first and the foremost thing is that you have still the potentialities of life. The toils in your life are never forgotten. Develop a positive mental attitude.

Take livey interest in the surroundings. Don't brood over the past or dwell in the future. Enjoy the persent perfectly. If you develop diverse interests in life, the chances of enjoying long and healthy life are greater. Don't think old age is a burden. Add 'LIFE' to your 'YEARS'. Remain 'full of life' which will keep you healthy, happy and peaceful. You are old only if you feel old. Young at heart will remain young forever.

**- C. N. Vazirani,** Nagpur.
Mobile No.- 9822717498

# State Bank Of India Pensioners' Association (Mumbai Circle), Pune

## Mumbai Zonal Sub-centre

A/5, Swami Siddharth CHS Ltd.
S. V. Road, Naupada
Thane 400 602
Tel No.- 25446837

Dt : 15th January 2009

## N O T I C E

The Managing Committee of the Mumbai Zonal Sub-Centre at its meeting held on the 10th January, 2009 has decided to hold the 22nd Annual General Meeting of our Association's Mumbai Zonal Sub-Centre on Wednesday the 18th February, 2009 at 12.00 noon at the following address:-

**Shri Shivaji Mandir (Natya Gruha), Opp. Plaza Theatre, N. C. Kelkar Path, Dadar (W) Mumbai 400 028.**

## A G E N D A

1) To condole the death of Bank's Pensioners/Family Pensioners/ Associate Members whose names have been reported to us after the 22nd February 2008. Members are requested to advise us the names and dates of death of members, if not found in the list to be read at the time of AGM.
2) To confirm the minutes of the Annual General Meeting held on the 22nd February, 2008 (Minutes published in November 2008 issue of Samvad)
3) To honour senior members who have completed/will complete 75 years age between the 22nd February 2008 and the 18th February 2009 (both days inclusive)
4) Committee's Report for the year 2008 to be read, discussed and adopted (A copy of the report is enclosed)
5) To discuss the recent developments.
6) Speech of the Chief Guest.
7) Speech of the President.
8) Any other business with the permission of the Chair.

By order of the Managing Committee
S. B. Gokhale
Principal Secretary

Encl.: Report

**********************************

**Note :-**

i) Please bring a copy of "Samvad" issue for December 2008 and January 2009 along with you for security purpose.

ii) Please inform other members, known to you, about this meeting.

iii) The meeting of the Bank's Pensioners arranged by the Bank on the 18th February 2009 will start at 12.30 noon at the same venue. (Due to excigencies of services the timing may be changed.)

**Important :** As per our practice, a memorandum covering all the problems will be submitted to the management well in advance to enable them to study and reply in Bank's Meeting. Pensioners/ Family Pensioners are, therefore, requested to furnish their problems to us in writing so as to

reach us say before 12/02/2009, so that a consolidated memorandum will be put up to the Bank Management to avoid direct questions/discussion with the management representatives in the meeting. This is requested to adhere to the time schedule.

iv) Snacks will be served on the 3rd Floor of the building as usual.

v) All seats in 'A' to'C' rows are reserved for special invitees. Members are requested to please occupy the other seats.

## Report of the Managing Committee of the Mumbai Zonal Sub-centre for the year – 2008

The last Annual General Meeting of our Circle Association was held at Pune on the 1st August, 2008.

1) **Managing Committee Meetings :** During 2008, four Committee Meetings were held which were well attended.

2) **Condolences :** We regret to advise the death of the members whose names have been/will be published in various issues of 'Samvad'. However, all the names will be read at the time of AGM. We extend our heartfelt condolences to the bereaved families.

**"May the departed souls of the members rest in peace"**

3) **Membership and Finance :** During 2008, 197 new members were enrolled as against 717 new members in 2007 as under :

| | | |
|---|---|---|
| Patron Members | : | 105 |
| Associate Patron Members | : | 85 |
| Associate Benefactor Members | : | 1 |
| Family Patron Members | : | 06 |
| Family Benefactor Members | : | NIL |
| **Total New Members Enrolled During 2008** | **:** | **197** |

Out of 197 New Members, the break up of old retirees and who retired during 2008 is as under:-

| | | |
|---|---|---|
| Old Pensioners/Associate/Family Pensioners | : | 17 |
| New Pensioners/Associate/Family Pensioners | : | 180 |
| **Total** | **:** | **197** |

The office bearers/the Committee Members who have been instrumental for enrolling 197 new members during the year are as under:-

S/Shri P.A. Lopes, S.W. Agarkar, S.M. Dharadhar, R.S. Rajiwadekar, P.S. Uchagaonkar, J.B.Pusalkar, M. V. Nadkarni and Miss Neela V. Vyavaharkar.

Due to exit policy adopted by the Bank in 2007 there was increase in membership.

Some of the existing Pensioners/Associate Members/Family Pensioners have become patron member by paying difference in the membership fee.We request our pensioners, family pensioners and associate members who are yet to become patron member to do so by paying the difference.

A sum of Rs. 3,85,225/- has been collected during the year under report as against Rs. 12,53,861/- during 2007.

The breakup of collection is as under:-

| | | |
|---|---|---|
| Admission Fee, Membership Fee | Rs. | 1,98,470 |
| Donations received for Building Fund | Rs. | 79,399 |
| Legal Fund | Rs. | 350 |
| Distress Relief Fund | Rs. | 250 |
| Misc. Donations | Rs. | 55,306 |
| Samvad Magazine | Rs. | 700 |
| Advt. in Samvad issue | Rs. | 50,750 |
| **Total** | **Rs.** | **3,85,225** |

We are glad to state that several members have given donations for various reasons viz.

1) Excellent work done by the Association; 2) Daughter's/Son's marriage; 3) 70th and 75th Birthday Ceremony; 4) In memory of beloved family members etc.

In this connection it is necessary to make a special mention of the following donees.

| Name of Donor | Amount | Name of Donor | Amount |
|---|---|---|---|
| Shri M.P. Khambete | Rs. 12,500/- | Shri Sorab Bhusania | Rs. 10,000/- |
| Shri S. S. Kharkhanis | Rs. 5,551/- | Shri U.R. Dhuri | Rs. 5,500/- |
| Shri H.A. Mistry | Rs. 5,101/- | A Well wisher | Rs. 5,001/- |
| A Well wisher | Rs. 5,001/- | Shri P.H. Hansotia | Rs. 5,001/- |
| Shri H.S. Hattangadi | Rs. 5,001/- | Shri R.V. Bhave | Rs. 5,000/- |
| Mrs. Meena Shevade | Rs. 5,000/- | Shri K.V. Chitre | Rs. 5,000/- |
| Smt. Meera Kulkarni | Rs. 5,000/- | Smt. Padmaja Mhadgut | Rs. 5,000/- |
| Shri Sunil C. Mone | Rs. 5,000/- | Smt. Sarita S. Avad | Rs. 5,000/- |

We have to reimburse the cost of flat to the extent of Rs. 10 lacs to Head Quarters. We have so far collected Rs. 7.09 lacs. Members are requested to kindly donate generously towards Building fund.

**4. Local Meetings :** During the year 2008, Five meetings of the Pensioners were held as under:-

| Sr.No. | Name of Branch | Branch Manager | Date of Meeting |
|---|---|---|---|
| 1. | SBI Andheri Branch (E) | Shri Kulkarni | 17-04-2008 |
| 2. | SBI Virar Branch | Shri Harish Chud Naik | 26-07-2008 |
| 3. | Dombivali (East) Branch | Shri Dilip Kulkarni | 17-09-2008* |
| 4. | SBI Dombivali (East) Branch | Shri Dilip Kulkarni | 28-11-2008 |
| 5. | SBI Naupada Branch | Shri Deepak Dandekar | 05-12-2008 |

* At the instance of GM Network-II

The present progress about the revision of Pension / Family Pension etc. was explained to the Pensioners. A session of questions & answers was also arranged during the meetings.

**5. Court Cases :** You are aware that Federation has supported a case filed by seven pensioners in the High Court, New Delhi against Govt. of India/Reserve Bank of India/State Bank of India. The case is adjourned to 12-1-2009. The prayers have been published in Samvad issue of November 2008. Federation has also initiated/impleaded in the cases filed at Hyderabad/Kerala/Nagpur and Bangalore. The subjects included in these cases are 7th Bipartite retirees/Family Pension, 100% Neutralization of DA. The Mumbai Circle will file case on "discrimination" in High Court of Judicature Mumbai shortly.

**6. IBI Employees Provident Fund Forefeiture A/c :**

Since the Government's approval is awaited, the Bank could not issue Circular for payment of Rs.5000/- to the IBI retirees for the year 2007 and remaining amount in 2008.

**7. Family Pension Scheme :**

The Family Pension was introduced in the Bank w.e.f. 1-1-86 in consultation with the RBI & prior approval of the Government of India and thereafter as pronounced by the Supreme Court on 23-2-1989, which is identical to the 4th Central Pay Commission where D.A. upto 332 pts. was merged. Thereafter four bipartite settlements for revision of salary have taken place however there was no revision in family Pension. Our Federation had been making persistent efforts to revise the Family Pension. We have even filed a case against the Bank/Govt. of India in the Nagpur Bench of Mumbai High Court. The working Staff Unions/Associations demanded family Pension at Industry level where D.A. upto 600 pts. was merged in this context please peruse article State Bank of India – Family Pension Scheme Then & Now written by Shri B.G.

Dandekar, President Federation of SBIPA which was published in Samvad in December 2008. The Industry level family Pension is being implemented in a phased manner.

NOTE: In the case of part time employees, Family Pension at 30% Flat rate is necessary to avoid anomalous position.

**8. Fix Personal Pay (FPP) :** Retirees under 8th Bipartite Settlement will get 50% of FPP as pension w.e.f. 1-5-2005 and D.A. will be paid on it. The development of Software to calculate and include the FPP in Pension is in progress. This will be paid in due course.

**9. SBI retired Medical Benefit Scheme :**

The Review of the captioned scheme was published in Samvad Issue of April 2008. The list of approved hospitals in Mumbai under retired employees medical benefit scheme and list of diagnostic centres in Mumbai are as under:

**Approved Hospitals in Mumbai**

1. Wockhardt Hospital Ltd., Mulund
2. Bombay Hospital, Mumbai
3. Dr. Balabhai Nanavati Hospital, Mumbai
4. Shushrusha Hospital, Mumbai
5. Jasolk Hospital & Research Centre, Mumbai
6. Tata Memorial Cenre, Mumbai
7. R.G. Stone Urological Research Centre, Mumbai
8. M/s. P.D. Hinduja Hospital, Mumbai
9. M/s. Cumballa Hill Hospital, Mumbai
10. M/s. Prince Alikhan Hospital, Mumbai
11. M/s. Asian Heart Institute, Mumbai

**Diagnostic Centres in Mumbai**

1. Sidhava X Ray Clinic, Mumbai
2. Anita Pathology Laboratory, Churchgate, Mumbai
3. Sukhsagar Clinic, Opera House, Mumbai
4. Prakruti Polyclinic, Bandra (W), Mumbai
5. BSES Hospital, Andheri (W), Mumbai
6. Anjali Pathology Lab, Malad (W), Mumbai
7. Dr. Mopkar's Diagnostic Lab, Nallasopara (W), Dist. Thane
8. Dr. Shah's Diagnostic & Medical Research Centre, Ghatkopar (E), Mumbai
9. Sai Siddhi Diagnostic Centre, Nerul, Navi Mumbai
10. Clini Labs, Borivali (W), Mumbai
11. Shree Gangotri Polyclinic, Dombivli (W), Dist. Thane
12. Candes Pathology Laboratory, Borivali (W), Mumbai
13. Singhvi X-Ray Clinic, Borivali (W), Mumbai
14. Suyash Diagnostic Centre, Thane

Medical Checkup camp for SBI Pensioners was arranged at M/s. R.G. Stone Urology & Laparoscopy Hospital, Khar, Mumbai 400 052 from November 2008 to January 2009.

**On Federation Front**

We are happy to inform all our Pensioner colleagues that the Governing Body of our Federation which met at Bangalore on 15th and 16th December, 2007 has decided to launch heroic struggle to resolve the long pending several demands/issues before the management and Government of India, New Delhi. The Governing Body has adopted the resolution and constituted an Action Committee to spearhed our movement. Shri V.M. Gokhale is one of the member of the Action Committee on behalf of our Circle Association.

As discussed in 3rd Action Committee Meeting held at SLC Hyderabad on 21-6-2008 the opinion of the affiliates was that our Federation should be strong and vibrant in days to come. Accordingly Action Committee and Coordination Committee met at Bangalore on 24-7-2008 for discussing the pending issues/anomalies in respect of superannuation benefits.

The Meeting decided to pursue the following issues vigorously.

a) Resolving the issue of Pension in respect of retirees under 7th B.S.
b) Anomaly relating to FPP (since resolved but payment is yet to be effected)
c) Upgradation of Pension in respect of earlier retirees
d) Pension at 50% of last drawn Pay
e) Commutation formula as per Industry Settlement
f) 100% DA neutralization for earlier retirees/Family Pensioners and
g) Family pension at 30% flat rate.

Since there was no progress in respect of the above demands, both with the Bank Management and also the Government of India, Banking Deptt. New Delhi, it was decided to hold a day long 'Dharna' in front of Corporate Centre on 23rd September 2008 in Mumbai and on 6th October 2008 at New Delhi. All other affiliates also staged 'Dharna' at respective Circles. The fraternal support and co-operation of the Staff Union and Officers' Association was sought for smooth implementation of the programme.

Due to legal problems/hurdles the 'Dharna' programme at Corporate Centre was shifted to Azad Maidan, Mumbai on 23rd September 2008. Both the working Staff Union/Association participated in Dharna. Retired Sr. Executives, viz. Mg. Director /CGMS/GM/Dy. GMS etc. participated in Dharna. The number of participants was more than 600. The Historic Dharna at Mumbai on 23rd September 2008 will be written in golden letters in the History of the Pensioners movement. On the same day a delegation under the leadership of Federation President Shri B.G. Dandekar, discussed about our demand with Smt. Bharati Rao, Dy. Mg. Director & CDO Corporate Centre, Mumbai and requested for early resolution of our demands. Smt. Bharati Rao assured the delegation that the Bank is in continuous dialogue with the Government authorities and expect solutions to some problems shortly. The Dharna was also arranged at Jantar Mantar, New Delhi on 6th October 2008 where more than 600 Pensioners/Family Pensioners participated. After the Dharna programme, the pensioners wentslogans were shouted in front of New Delhi LHO and Banking Deptt. Government of India, New Delhi. This was a unique event and this is also a golden day, as this is the first time that Pensioners marched on Parliament Street. The logistic support was extended by the working Staff Union/Association.

Shri B.G. Dandekar, with the good offices of Shri R. Nagrajan, President of Chennai Circle Pensioners' Association sought an appointment on 30th September 2008 at 3.00 p.m. with Shri K.V. Eapen IAS Jt. Secretary (IR) Government of India, Deptt. Of Banking & Financial Services, New Delhi. Shri B.G. Dandekar, President, Shri V.M. Gokhale, President SBIPA, Mumbai Circle, and Shri H.R. Magon, General Secretary, SBIPA, Delhi Circle met Shri K. V. Eapen, IAS on 30th September 2008 at 3.00 p.m. Shri Dandekar explained how various anomalies have been cropped after every salary revision since1987. Shri Eapen gave patient hearing to our issues for over one hour and assured to look into the problems. Shri M.K. Malhotra Under Secretary, Banking Department was also present in the Meeting.

As there was no progress in settlement of any of our problems from the Bank's side, it was felt necessary to have a follow up Meeting with Banking Dept. Officials. Accordingly a meeting was arranged with Shri K.V. Eapen on the 19th December 2008 to understand the Government's thinking on the various matters. The Federation was represented by Sarvashri B.G. Dandekar, V.M. Gokhale, and P.K. Pathak, from Delhi Circle (in place of Shri H.R. Magon).

The following issues were again explained in detail.

a) Denial and recovery of dearness relief to a group of retirees whose pensionable service ceased prior to 1-11-1987;

b) Lowest i.e. 31% of pay as pension to a group of pensioners whose pensionable service ceased during 1-11-1987 and 31-10-1993;

c) Fixed Pension (Rs.4250 p.m.) to all Officers under various categories, during 1-11-1993 and 28-2-1999;

d) Even after implementation of 50%-40% formula officers from Scale I to IV are getting one fixed pension (Rs.4250 p.m.) although their salaries are different. There is no change even now.

e) Retirees between 1997 to 2002 are in receipt of pension calculated on pre-revised salary though those who retired after 31-10-2002 are in receipt of pension calculated on the actual salary of the employee at the time of retirement. In this connection time and again we requested to know the reasons for this discrimination. However there was no reply.

We also brought to the notice of the officials the latest judgement of the Madras High Court on this subject and requested to implement the directions of the High Court. However, we were told that the matter has been referred to their Law Department for opinion. (We understand from the Bank authorities that no appeal will be filed by the Bank)

f) We emphasized the need for extending the formula of '100% D.A. neutralization' to all earlier retirees;

g) We brought to the notice of the officials the anomalies in the payment of family pension according to 'Industry level formula' and requested to adopt the formula of 30% (flat rate) of pay as Family Pension identical to the recommendations of the 5$^{th}$ Pay Commission;

h) We also brought to their notice that the former Dy. M.D's gross pension is less than the gross pension of a clerk who retired in 2006 and requested for updation of pension as implemented for the pensioners of Government. However, the officials forcefully stated that this principle will not be extended to the employees in the Banking Industry. When we cited Reserve Bank's example, they said that instructions have been issued to RBI to withdraw this facility.

As promised by Shri V. D. Deshpande, AGM, PPG Department, CC Mumbai, at the time of AGM held on 22$^{nd}$ February 2008, all the promises have been fulfilled except a booklet to be published for retirees which is under print and would be issued to Pensioners in due course.

There are two SBI Pensioners' Clubs functioning at Andheri (E) and Thane. Both the clubs are undertaking excersion programme, speeches by the prominent persons, cultural activities etc.

In the Association Office the library is functioning which has more than 700 books. Shri Vasant Kanhere is a librarian who functions efficiently.

Shri V.M. Gokhale, President SBIPA Mumbai Circle and Shri S.B. Gokhale, Principal Secretary attended the AGM, Aurangabad Zonal Sub-centre at Dhule on 16-03-2008.

We thank Corporate Centre Executives, Staff of PPG Deptt. at Corporate Centre and Mumbai LHO for their co-operation in solving our problems. We thank Shri Y.S.S. Kapdi/Shri B.B. Das, Chief General Manager (HRD), Shri A.V. Deole, Dy. GM (IR), Shri K.K. Das, Dy. GM PPG, Shri S.B. Lal/Shri Chopra, Chief Manger (Personnel), Shri V.D. Deshpande, AGM PPG Deptt., and Shri S. S.Pradhan, Dy. GM (PRO), Shri Chintamani Mulay, PPG Deptt., all from Corporate Centre with whom we had discussions regarding several problems.

We thank Dr. (Mrs.) V.M. Ajinkya, Chief Medical Officer and Shri V.M. Panchbhoy Administrative Officer, Medical Deptt. Corporate Centre for their advices.

Further, we thank Mumbai Circle Authorities, specially Shri N. Raja, CGM, Shri Sunil Pant (GM), Shri Sharad Sharma (GM), Shri.Abhay Kumar Singh, Shri.R.J.Ghatey, Shri Rajeev Lal, DGM & CDO, and Shri A.G. Herlekar/Smt. Varsha Mondkar, AGM (Personnel & HRD); officers from Staff Welfare cell at Mumbai LHO, Shri V. Sequira (PRO) Mumbai LHO, Shri A.M. Salvi, AGM PPG Deptt. and Staff Members from PPG Deptt. Mumbai LHO., Mrs. Manisha Padhye, Sr. Medical Officer Mumbai LHO.

We also thank Shri A. T. Bodele, AGM, ZO Mumbai, Mrs. Shailaja Gharat/Shri Kamat, CM Personnel & HRD, Shri V. Vishwanathan, Dy. Manager, from Personnel & HRD and Welfare Cell, Dr. Ramesh Nair, Sr. Medical Officer, Zonal Office, Mumbai for extending excellent co-operation to our Association.

By Order of the Managing Committee
S. B. Gokhale
Principal Secretary

( We give below the **corrected** Table of Revision of Family Pension which was published on page 9 of December 2008 issue for the information of the members)

**Gross Family Pension on the basis of Salary revisions from time to time with D.A. Merger to the extent of 100; 200; 332; 600; 1148; 1684 & 2288 points (CPIN – 1960 = 100) as on 31-12-2007**

| | Existing Gross | | | Revised Gross | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Category | 100 | 200 | 332 | 600 | 1148 | 1684 | 2288 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| Subordinate-Staff | 2735 | 2735 | 2735 | 2217 | 2212 | 2217 | 2378 |
| Clerical | 2735 | 3459 | 4104 | 2956 | 2958 | 2963 | 3220 |
| JMGS-I (Sub Acctt.) | 3882 | 4991 | 4104 | 3439 | 3549 | 3751 | 4088 |
| MMGS-II | 5015 | 4991 | 4138 | 3735 | 3840 | 4052 | 4450 |
| MMGS-III | 5656 | 4991 | 4572 | 3735 | 3935 | 4152 | 4570 |
| SMG-IV | 5656 | 4991 | 4646 | 3956 | 4033 | 4252 | 4690 |
| SMG-V | 5656 | 4991 | 4863 | 4360 | 4418 | 4652 | 5172 |
| TEGS-VI | 5656 | 4991 | 5217 | 4804 | 4881 | 5095 | 5701 |
| TEGS-VII | 5656 | 5409 | 5405 | 5139 | 5401 | 5611 | 6197 |
| Spl.Gr-I (CGM) | 5656 | 5666 | 5493 | 5286 | 5555 | 5927 | 6197 |
| Spl.Gr-II Dy. M.D. | 6134 | 5779 | 5641 | 5434 | 5709 | 6183 | 6197 |

# युनिट वार्ता

**सोलापूर युनीट :** सोलापूरातील स्टेट बँकेच्या बाळीवेस शाखेच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून दि. २३ नोव्हेंबर २००८ रोजी येथील हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या ॲफी थिएटर मध्ये एक आगळा-वेगळा असा 'गाता-गाता चित्रनिर्मिती' चा कार्यक्रम सादर करण्यात आला. या अंतर्गत आपले एक सभासद पंडित अविनाश जोजारे, जे उत्तम संगीत साधक व चित्रकारही आहेत, यांचा गाता-गाता चित्र काढण्याचा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम झाला. वर्षा ऋतूतील पावसाळी रागांचे आलाप व ताना घेत, आरोह-अवरोहांचा बहारदार वर्षाव करीत, हातातील कुंचल्याने समारेच्या कॅनव्हासवर रंगांची बेमिसाल उधळण करीत, आभाळात दाटलेल्या नभांच्या गर्दीतून धरेवर झेपावणाऱ्या जलधारांचे सुंदर 'चित्रशिल्प' साकारण्याचे कौशल्य पं.जोजारे यांच्या हातातून प्रकट होतांना पाहण्याचा आनंद उपस्थित श्रोत्यांनी घेतला. सूर, ताल व लय यांच्या अवघड गुंत्यात न गुंतता त्यातून अलिप्त होऊन, हातातील कुंचल्याने चित्र रेखाटतांना रंगात रंगून जातांना पं.जोजारे तल्लीन होतात. तसेच त्यांच्या साक्षीदारांनाही दुहेरी आनंद मिळवून देतात आणि 'गुंत्यात गुंतूनी सगळ्या पाय माझा मोकळा। रंगात रंगुनी सगळ्या रंग माझा वेगळा ।।' या कवि सुरेश भटांच्या काव्यपंक्तिचीच आठवण करून देतात. स्टेट बँकेच्या बाळीवेस शाखेतील श्री.लिमये साहेबांच्या उपस्थितीत बँकेचे कर्मचारी, पेन्शनर्स व इतर रसिकांनी या अविस्मरणीय कार्यक्रमाचा आनंद लुटला. पंडित जोजारे यांना त्यांच्या या अलौकिक छंदासाठी असोसिएशन तर्फे हार्दिक शुभेच्छा.

**- तम्मा पाटील, सेक्रेटरी**

**डोंबिवली युनीट :** १) १७ सप्टेंबर २००८ रोजी मा.श्री.अभयसिंग, जनरल मॅनेजर (नेटवर्क-२) यांचे उपस्थितीत, डोंबिवली (पूर्व) शाखेचे शाखाधिकारी श्री.दिलीप कुलकर्णी यांनी बँकेच्या निवृत्तीवेतनधारकांची एक सभा आयोजित केली होती. या सभेत श्री.नरेंद्र भणगे, रीजनल मॅनेजर व श्री.पाटील, शाखाधिकारी, एम.आय.डी.सी.डोंबिवली शाखा, हे ही उपस्थित होते. सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार झाल्यावर श्री.आगरकर यांनी पेन्शनरांच्या कांही अडचणी मांडल्या. त्यात प्रामुख्याने, दुर्दैवाने एखाद्या कर्मचाऱ्याचा मृत्यु झाल्यावर त्याच्या पत्नीस फॅमिली पेन्शनसह प्रॉव्हिडंट फंड इ. निवृत्तीनंतरचे सर्व फायदे लवकरात लवकर तिच्या रहाण्याच्या ठिकाणाजवळील बँकेच्या शाखेत मिळण्याची व्यवस्था होणे आवश्यक असल्याचा उल्लेख केला. मान्यवरांनी सर्व उपस्थित पेन्शनर्सना संबोधित करून त्यांच्या अडचणी प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन दिले. सभेनंतर बँकेतर्फे अल्पोपहाराची व चहापानाची उत्कृष्ठ व्यवस्था केली होती.

२) दि.२८ नोव्हेंबर २००८ रोजी डोंबिवली (पूर्व) शाखेचे शाखाधिकारी श्री.दिलीप कुलकर्णी यांनी बँकेच्या

निवृत्तीवेतनधारकांचा एक मेळावा आयोजित केला होता. याही मेळाव्यास पेन्शनरांची उपस्थिती (७६) चांगली होती. या सभेत प्रथम, मुंबईवरील नुकत्याच झालेल्या अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या सर्व कमांडोज्, पोलीस अधिकारी/सैनिक व निरपराध नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. शाखाधिकारी श्री.दिलीप कुलकर्णी हे दोन दिवसांनंतर निवृत्त होणार असल्याने त्यांना शुभेच्छा देऊन झाल्यावर, नविन शाखाधिकारी म्हणून आलेल्या श्री.धारवाडकर यांचे स्वागत श्री.जांदे यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. श्री.धारवाडकर यांनी आपल्या भाषणात, आतापर्यंत पेन्शनर्सना याआधी जसे शाखाधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सहकार्य मिळाले तसेच सहकार्य यापुढेही मिळेल असे आश्वासन दिले. तसेच गर्दीच्यावेळी पेन्शनर्ससाठी वेगळे काउंटर उघडून सुविधा देण्याचे प्रयत्न करण्यात येतील असे सांगितले. श्री.आगरकर यांनी श्री.कुलकर्णी यांना सर्वांतर्फे शुभेच्छा देऊन आपल्या संघटनेचे लगेचच सभासद करून घेऊन स्वागत केले.

वरील दोनही सभांच्या यशस्वी आयोजनात श्री.जांदे, श्री.फडके व श्री.जमदग्नी या स्थानिक कार्यकर्त्यांनी चांगले योगदान दिले. तसेच श्री.वेचलेकर यांनी याप्रसंगी रू.१००१ ची असोसिएशनला देणगीही दिली.

आपल्या फेडरेशनच्या आवाहनाप्रमाणे दि.२३ सप्टेंबर २००८ रोजी झालेल्या '**धरणे**' कार्यक्रमात डोंबिवली युनीटच्या ४० कार्यकर्त्यांनी भाग घेऊन आपल्या सर्कलचे अध्यक्ष श्री.व्ही.एम.गोखले यांचेकडून वाहवा मिळवली.

– **सुभाष आगरकर,** सहा.कार्यवाह (मुंबई)

**नाशिक युनीट :** आपल्या नाशिक युनीटच्यावतीने व नाशिकरोड येथील 'ओम हॉस्पिटल' यांचे संयुक्त विद्यमाने, दि.२१ सप्टेंबर २००८ रोजी आपल्या नाशिक मुख्य शाखेच्या सभागृहामध्ये, सहा.महाव्यवस्थापक श्री.अशोक कुलकर्णी यांचे उपस्थितीत 'संधिवात व गुडघेदुखी' या विषयावर डॉ.देवरे यांचे व्याख्यान व 'तपासणी' शिबीराचे आयोजन केले होते. त्या आधी ३ दिवस अतिशय जोरदार पर्जन्यवृष्टीमुळे, ठरविलेला कार्यक्रम होईल कीं नाही याची शंका होती. पण वरुणराजाने विश्रांती घेतल्याने कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. अंदाजे ७५/८० सदस्यांनी या संधीचा लाभ घेतला.

'ओम हॉस्पिटल' चे डॉ.तुषार देवरे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत जवळजवळ २ तास 'संधिवात' व त्याचे प्रकार याविषयीची सविस्तर माहिती 'चित्र-फितीचे' सहाय्याने दिली. तसेच आधुनिक संगणकीय शस्त्रक्रियांचेद्वारे गुडघेदुखीवर मात करून सामान्य आयुष्य उतारवयात जगता येऊ शकते असा दिलासा उपस्थितांना दिला. त्याचबरोबर सदस्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे योग्य पद्धतीने निरसनही केले. २०/२२ सदस्यांनी या शिबीरात तपासणी करून घेऊन डॉ.देवरे यांनी त्यांना उपाय व उपचार सुचवून औषधांचे वाटपही केले. आपले ज्येष्ठ सदस्य श्री.मधू रानडे यांनी कार्यक्रमाचा समारोप करतांना डॉ.देवरे व त्यांचे सहकारी यांचे मन:पूर्वक आभार मानले. तसेच श्री.अशोक कुलकर्णी, सहा.महाव्यवस्थापक, यांनी बँकेचे सभागृह कार्यक्रमासाठी उपलब्ध करून दिले व स्वत: उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचेही आभार मानले. श्री.जोशी यांच्या 'पसायदानाने' कार्यक्रमाची सांगता झाली.

– **वामन बेळे,** सेक्रेटरी

**सातारा युनीट :** सातारा युनीट दर महिन्याच्या १० तारखेस स्थानिक सभासदांची सभा नियमितपणे आयोजित करते. गेल्या डिसेंबर महिन्याच्या सभेत, आपली असोसिएशन/फेडरेशन पेन्शनविषयक प्रलंबित मागण्यांच्या संदर्भात करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल माहिती देऊन झाल्यावर, सर्व सभासदांनी मुंबई येथे २६ ते २९ नोव्हेंबर ०८ च्या दरम्यान अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याचा तीव्र शब्दात धिक्कार करून, त्यात मृत्युमुखी पडलेल्या सैनिकांना, कमांडोंना, पोलिसांना व निरपराध नागरिकांना श्रद्धांजली वाहून तशा आशयाचा ठराव पास करण्यात आला.

– **एस.एस.देशपांडे,** अध्यक्ष

Shri. M. M. Sharma, retired Dy. Gen. Manager, who has now settled in Pune, was the Chief Guest at the Annual General Meeting of our Chandigarh Circle Pensioners' Association which was held on 16th November 2008 at Chandigarh. While addressing the gathering Shri.Sharma thanked the Chandigarh Circle Association's office-bearers for giving him an opportunity to meet the old colleagues from his parent Circle and interact with them. He apprised that the Government machinery still does not appear to be inclined to accept our legitimate demands for revision of pension of 7th Bipartite retirees and earlier pensioners. He conveyed his good wishes for purposeful discussions on various issues confronting the pensioners. The Association conveyed its gratitude to Shri.M.M.Sharma and presented a shawl and a bouquet while honouring him on the occasion.

(courtesy - Chandigarh Circle Assn's magazine "S.B.I.Pensioners Mail" - November 2008 issue)

(We reproduce below the Corporate Centre's Circular No.NBG/BOD-GB/20/2008-09 dated 06-08-2008 on Service Charges for non-home transactions)

## WHICH ARE EXEMPT FOR PENSIONERS OF OUR BANK

### Personal Banking Business, Rationalisation of Service Charges, Inter-Core Transactions Non-home transavtions

Please refer to e-Circular No.NBG/BOD-GB/50/2007-08 dated 09-01-2008. it has been decided by the competent authority to revise the service charges of inter-core transactions as detailed below.

| Sr. No. | Facility | Maximum Amount | Charges |
|---|---|---|---|
| i) | Deposit of cash at non-home branches | Rs.25,000/- per day | Rs.2/- per 1000. Min Rs.25/- per transaction |
| ii) | Deposit of cheques at home / non-home CBS Branch, drawn on any CBS branch / other Banks | No Limit | Intracity, Intercity (per transaction) Upto Rs.20,000/- - free; Above Rs.20,000 & upto Rs.5.00 lac - Rs.1.50 per 1000. Above Rs.5.00 lac Rs.1/- per 1000.Min Rs.750/-. and Max Rs.1,250/- |
| iii) | Deposit of clearing instruments at non-home CBS Branch, drawn on non-CBS branch / other Banks | No Limit | Same as above |
| iv) | Encashment of cheque at non-home branch | Cash withdrawal (by the account holder) : Rs.50,000/- per day. | Free |
| | | Transfer to another SB / CA at another CBS Branch | Same charges as in term (ii) above |
| | | Issuance of draft / B.Ch./TT | Same charges as in item no.(ii) above + Issuance charges. |
| v) | Transfer of funds from home branch to third party accounts at another CBS Branch | No Limit | Same charges as item (ii) above |
| vi) | Pass-book updation at non-home branch | ---- | Rs.10/- per pass-book |

**Note :**

a) Charges are to be recovered from the account where the credit is afforded. However, no recovery shall be effected from the accounts of Vishesh Customers and holders of Savings Plus and Premium Savings Accounts.

b) Charges recovered are to be credited to the branch which puts through the transaction.

c) Transactions put through at non-home branches, where both the legs (debit and credit) involve inter core transactions at out-station branches; will be charged for one leg only.

d) Circles have the discretion to reduce the maximum cash withdrawal limit per non-home transaction at non-chest branches.

e) **Non-home transactions will be allowed to be conducted without any service charge from all staff/ pensioners and staff of Associates.**

f) Specialized branches like SPBs and PBBs are exempted from doing non-home transactions.

g) Special Branches like Core-Power branches will do all non-home transactions without charging any fee.

2. GIT Centre is trying to incorporate the charges in the software itself by 01-09-2008. In case the charges are not effected by them, the branches should be in a position to recover the charges manually.

3. While we are arranging to display the revised service charges on Bank's intranet / website, please arrange to display the charges on Branch Notice Boards for information of the public immediately.

4. please arrange accordingly.

Sd/-
For Dy. Managing Director & Group Executive (NB)

(Courtesey - SBI Elders Voice, magazine of Chennai Circle Pen.Assn.)

# j मोर्चा ही मोर्चा

काही महिन्यांपूर्वीची गोष्ट. स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशनतर्फे 'खरे' साहेबांचा फोन आला. म्हणाले, ''आपल्या पेन्शन रिव्हिजनसाठी जे प्रयत्न सुरू आहेत, त्या संदर्भात मॅनेजमेंटला एक 'मोठा धक्का' द्यायचा आहे. एक 'धडक मोर्चा' काढून नरीमन पॉईंट येथील मुख्य कार्यालयासमोर 'धरणं' धरण्याची मोहिम आखली आहे. तेव्हा जास्तीत जास्त सभासदांनी, विशेषत: महिलांनी यामध्ये सहभागी व्हावं असं आम्हाला वाटतं.''

आमच्या 'व्ही आर एस' ग्रुपने एकमेकांना फोनाफोनी केली तेव्हा असा सूर निघाला- 'संघटनेचे असे फोन जेव्हा येतात तेव्हा आपण एकतर कानाडोळा तरी करतो किंवा काहीतरी सबबी तरी पुढे करतो, पण त्यांच्या कष्टांमुळे मिळणारं लोणी खायला मात्र सगळ्यांचेच हात पुढे असतात, तेव्हा या खेपेला तरी जाऊन बघूया.'

या 'पुळक्यामागची' खरी गोम अशी होती की, ' या आंदोलनाला जास्तीत जास्त प्रतिसाद मिळावा म्हणून संघटनेच्या 'ठाणा' शाखेने एक बसच बुक केली होती. झालंच तर पोटपूजेचीही व्यवस्था केली होती. त्यामुळे फुकटची मुंबई दर्शन ट्रीप आणि असोसिएशनला पाठिंबा असं दुहेरी पुण्य पदरात पडणार होतं. एवढं होतं तरीसुद्धा निम्म्या बायका गळल्याच.

बसमधल्या चाळीस जणात निम्मा ग्रुप आमचा होता. लवकर आवरायची सवय सुटल्याने, सकाळची साडेआठची वेळ गाठताना खरंतर आमची दमछाकच झाली. पण बस सुटल्यावर, थोड्याच वेळात खिडकीतून येणारं वारं आमच्या कानात भरायला लागलं.

लिलवानी साहेबांनी अंताक्षरीची टूम काढली आणि गळे मोकळे होऊ लागले. हळूहळू सहलीचा मूड जमू लागला. तरीही पुढे बसलेले ज्येष्ठ मात्र, आठवणीने बरोबर आणलेला पेपर उघडून, स्वत:च्याच कोषात गुरफटून बसले होते, अकस्मात त्या स्थितप्रज्ञांपैकी एक, म्हणजेच एस.जी.दांडेकर साहेब 'पीछे मुड' करत उभे राहिले आणि त्यांनी चक्क गाणं म्हणायला सुरूवात केली. 'त्या सावळ्या तनूचे मज लागले पिसे ग....' आणि आमची बोलतीच बंद पडली.

गाणं संपल्याबरोबर टाळ्यांचा पाऊस पडला आणि आमच्या जीभेवर 'अवधूत गुप्ते' स्वार झाला. लइ भारी, चाबूक, एकदम फंडू, वा राव पार बुक्का पाडलात की, मोडून-तोडून चोळामोळा करून फेकून दिलंत तुम्ही आम्हाला... इ.इ. खरं तर या गाण्यात विशेष हरकती नाहीत तरी देखील कुणीसं म्हणालं की तुमच्या गाण्यातून ताना-मुरक्या फार छान येत होत्या म्हणून..... एकूण काय तर सगळेच सुटले होते. काही वर्षांपूर्वी रिजनल ऑफिसमध्ये काम करणाऱ्या या कडक इस्त्रीच्या सायबाच्या केबिनमध्ये शिरताना आत-बाहेर करणाऱ्या आम्ही आज त्यांना शाबासकी देण्याएवढ्या शूरवीर झालो होतो. कारण आता आम्हा सर्वांच्या कॉलरवरील लेबल एकच होतं, 'स्टेट बँक पेन्शनर.'

बस मध्य मुंबईहून जाऊ लागली, तशी परळ भागात बालपण गेलेल्या भारतीच्या अंगात वीरश्री संचारली. डावीकडे बघा, ती उंच, नवी इमारत दिसतेय ना, तिथे पूर्वी हिंदमाता थिएटर होतं. त्याच्या मागे आहे ती 'अहमद सेलर बिल्डिंग.' आपले मनोहर जोशी पूर्वी इथेच रहात. तिची रनिंग कॉमेंट्री सुरू झाली आणि आम्ही टकमक टकमक बघू लागलो. पण तिच्या बोटाच्या दिशेने आम्ही बघेपर्यंत बस पुढे निघून जायची आणि मग उगीचच 'दिसला गं बाई दिसला' या तालावर आमच्या माना खोट्या खोट्या डोलायच्या. राणीचा बाग बघताना (अर्थात् बाहेरूनच) तर माझ्या मनात तिसरी क च्या ट्रीपची आठवण अगदी दाटून आली.

त्या आठवणींच्या तारेवर स्वार असतानाच आमची बस हेड ऑफिस समोर थांबली. तिथे पोहोचल्यावर भलतीच बातमी कानावर पडली, 'बँकेने म्हणे, रातोरात हायकोर्टाकडून कार्यालयाच्या आवारात मोर्चा-बंदी हुकूम मिळवला होता.' आम्हाला घाबरले बहुतेक. पण आम्ही काही मेल्या आईचं दूध प्यालो नव्हतो. आमचाही निश्चय ठरला. 'हम धरणं धरने आए हैं । धरणं धरकरही रहेंगे ।'

तेवढ्यात आमच्या नेतेमंडळीत खलबतं झाली आणि 'आझाद' मैदानावर सभा घ्यायचं ठरलं. त्यानुसार आम्ही पुन्हा एकदा बसमध्ये शिरलो आणि इकडून तिकडे पोहचलो. आत्तापर्यंत या मैदानाचं दर्शन फक्त दूरदर्शनवरील बातम्यांमधून घडलं होतं किंवा त्यासंबंधी वृत्तपत्रांतून वाचलं होतं. पण प्रत्यक्ष भेटीचा योग असा अनपेक्षितपणे जुळून आला.

प्रवेशद्वारापाशीच 'भाडोत्री रहिवाशी संघाचा' मेळावा भरलेला दिसला. पुढचं स्टेज, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषदेच्या नेत्यांनी व्यापलं होतं. त्यांनी ही जागा म्हणे अगोदरच बुक केली होती. त्यांच्यासमोर इतर कर्मचाऱ्यांसमवेत अंगणवाडी शिक्षिकांचा मोठा समुदाय उन्हात तळपत बसला होता. लाऊडस्पीकरवर आवेशपूर्ण भाषणं सुरू होती..

सावलीतला एक कोपरा पकडून आम्ही फतकल मारली आणि टाइमपास म्हणून बरोबर नेलेलं च्याऊ-म्याऊ तोंडात टाकायला सुरूवात केली. तेवढ्यात कुणीतरी म्हणालं, सांभाळून खा बरं. इथे फोटोग्राफर फिरतायत. उद्या 'आधी पोटोबा आणि मग विठोबा' या हेडींगखाली तुमचा फोटो पेपरात झळकेल, तेव्हा सावधान. अर्थात् या चिलू-पिलू इशाऱ्याने खादीची चळवळ काही थांबली नाही, पण सावध झालो इतकंच.

आत्मा शांत झाल्यावर 'गंमत' म्हणून आम्ही शेजाऱ्यांच्या आवाजात आवाज मिसळला. 'आगे बढो हम तुम्हारे साथ है । झिंदाबाद, मुर्दाबाद, जो हमसे टकराएगा, मिट्टीमें मिल जाएगा, आवाज दो, हम एक है'.... इ. इ. शहाण्यासुरत्या माणसांनी न मागता

दिलेला हा सपोर्ट बघून ती मंडळी गहिवरली आणि त्यांनी उदारपणे अर्ध्या तासाचा ब्रेक घेऊन आमच्या लीडर्सकडे आपला माईक सोपवला. या वेळाचं सोनं करत आमच्या असो. अध्यक्ष बी.जी.दांडेकर साहेब यांनी या आंदोलनासंदर्भात आम्हाला अपटुडेट केलं. दिलेल्या वेळेला जागून, इतर वक्त्यांनीही वेळेत आवरतं घेतलं आणि थोड्याच वेळात अल्पोपहाराची पाकीटे एकमेकांकडे पास होऊ लागली.

खमंग वड्यांबरोबर गप्पांनाही रंग चढला. या मोर्चासाठी आमचे पेन्शनर मित्र, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, गोवा असे लांबून लांबून आले होते, निवृत्तीनंतर मुंबई सोडून इतरत्र स्थाईक झालेल्या या मंडळींची या मोर्चा निमित्ताने 'राम-भरत' भेट घडली आणि मनं मोकळी होऊ लागली.

'लेका, गेल्या महिन्यात शुगर एवढी वाढली की वाटलं आता वाढीव पेन्शन स्वप्नातच राहते की काय !' या तक्रारीनंतर ऐकणाऱ्याने आपल्या बायपासची कथा आणि व्यथा सांगायला सुरूवात केली. कोणाचं 'बी.पी.' उड्या मारू लागलं होतं तर कोणी किडनीस्टोनने हैराण झाला होता, मात्र गुडघेदुखी, निद्रानाश, विस्मरण या कायमचे सोबती बनलेल्या दुखण्यांशी बहुतेकांनी ॲडजेस्ट करून घेतलं होतं.

त्यामानाने बायकांच्या गप्पातील विषय वेगळे होते. बऱ्याच जणींना लेकीसुनांच्या बाळंतपणाच्या निमित्ताने फॉरीन रिटर्न पदवी मिळालेली. मग काय विचारता ? देशोदेशींच्या बालसंगोपनाच्या पद्धती यावर एक खुमासदार परिसंवादच तिथे रंगला. त्याशिवाय तू कोणता डाय वापरतेस गं ? किंवा तुझ्या मूळच्या दातांपेक्षा हे नवं डेंचर एकदम सही दिसतंय. असे जिव्हाळ्याचे विषय तोंडी लावायला होतेच. या गोतावळ्यात, नोकरीच्या सुरूवातीला माझ्याबरोबर काम करणारी एक कलिग मला पुऱ्या ३२ वर्षांनी भेटली. या संपूर्ण कालखंडाचा इतिहास आम्ही कसाबसा ३०/३५ मिनिटात संपवला.

आल्यासरशी आझाद मैदानासभोवतालचा परिसरही आम्ही पायाखालून घातला. या परिक्रमेत बाहेरची चहाची टपरी आणि कोपऱ्यातलं सुलभ शौचालय या दोन प्रेक्षणीय स्थळांनाही भेटी दिल्या.

तेवढ्यात बस सुटतेय अशी हाकाटी कानावर आली. पुन्हा एकदा मुंबई ते ठाणे प्रवासभर गप्पांची नॉनस्टॉप मैफल रंगली. बँकेत असताना मिळणारा रोजचा अर्ध्या तासाचा लंच ब्रेक हा रोटी, कपडा आणि मकान यांच्या इतकाच गरजेचा आहे. हे आम्हाला पुन्हा एकदा पटलं आणि तो दिवस खऱ्या अर्थाने सार्थकी लागला. वाढीव पेन्शन मिळायची तेव्हा मिळेल पण या मोर्चाने आम्हाला दिलेली ही रिफ्रेशिंग भेट खरोखरच अनमोल होती.

**- संपदा वागळे,** ठाणे.

भ्रमणध्वनी - ९३२४०७६२४९

## j पुस्तक परिचय : 'सार्थक'

आपले एक सभासद श्री.गोविंद भार्गव बागुल, पुणे ह्यांनी स्वास्थ्य, श्रद्धा, मुक्ती ह्या विषयांवर 'सार्थक' हे पुस्तक लिहून ज्येष्ठ नागरिकांच्या ज्ञानात मोलाची भर टाकलेली आहे. बँकेतील माणसे नुसती आकडेमोड करणारी नसतात. त्यांची अनेक विषयात गती असते. १९९३ साली निवृत्त झाल्यावर श्री. बागुल यांनी 'दासबोध' ग्रंथाचा सखोल अभ्यास करून लिखाणास सुरूवात केली. त्यातूनच त्यांना 'सार्थक' ह्या पुस्तकाची कल्पना सुचली. पुस्तकात अनेक संस्कृत व इंग्रजी अवतरणांचा योग्य वापर केला आहे. स्वास्थ म्हणजे काय, त्याच्या व्याख्येपासून सुरवात करून वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक स्वास्थ्याबद्दल उत्कृष्ट उहापोह श्री.बागुल ह्यांनी केलेला आहे. त्यात बालमानसशास्त्र, मातापित्यांची कर्तव्ये, तरुण व ज्येष्ठ ह्यांनी आपले स्वास्थ कसे टिकविले पाहिजे ह्याचे विवेचन आहे. श्रद्धेशिवाय माणूस जगूच शकत नाही. श्रद्धा हीच जीवननिष्ठा आहे. अविचल विश्वास म्हणजेच श्रद्धा. मुक्ती ह्या विषयावर केलेले भाष्यही अतिशय सुंदर आहे.

आपल्याला मिळालेल्या जीवनाचे सार्थक व्हावे. असे प्रत्येक ज्येष्ठास आतून वाटत असते. त्यासाठी सदर पुस्तक ज्येष्ठास नक्की प्रेरणा देईल. पुस्तकाची किंमत अत्यंत अल्प म्हणजे रू.७५/- असून आपल्या सभासदास ते फक्त ५०/- रूपयात मिळणार आहे. सर्वांनी त्याचा लाभ घ्यावयास हवा. ह्या साहित्यकृतीबद्दल श्री.बागुल ह्यांचे अभिनंदन.

**- शरद शिंगवेकर, पुणे**

**दूरध्वनी - २४५३३३००**


## प्रसिद्ध झाले - प्रसिद्ध झाले

पुस्तकाचे नाव - **'सार्थक'** (स्वास्थ, श्रद्धा-मुक्ती)

लेखक - श्री. गोविंद भार्गव बागुल

प्रस्तावना - समर्थभक्त श्री सुनीलजी चिंचोलकर

व्यक्ती, कुटुंब व समाज यांच्या सांप्रत स्थितीचे

अध्यात्मग्रंथांच्या आधारे सोप्या भाषेत केलेले वस्तुनिष्ठ विवेचन

पृष्ठे - १५२. मूल्य रू.७५/- सवलत मूल्य - रू. ५०/-

पोस्टाने हवे असल्यास सभासदांना टपालखर्चासहित रू.७५/-

संपर्क - श्री.गोविंद बागुल. दूरध्वनी - (०२०) २४३४७०७०

भ्रमणध्वनी - ९४२३५५८३५७

पुस्तक सवलतीत खालील ठिकाणी उपलब्ध -

श्री. राजाराम परांजपे - पवन प्लॅस्टिक्स

जिलब्या मारुती शेजारी, १४७८ शुक्रवार पेठ

मंडई रस्ता, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी - (०२०) २४४५५१६८

Advt.

## j क्षेपणास्त्र

सध्याच्या शीतयुद्धकाळात समजा जर अमेरिकेने रशियाच्या दिशेने क्षेपणास्त्रे सोडली तर रशियन उपग्रह ३ सेकंदात ही माहिती रशियन सैन्याला देतील व रशियन सैन्य ५ सेकंदांच्या आत ती क्षेपणास्त्रे वरच्या वर रोखून नष्ट करतील - अशी या दोन देशांची आजची तयारी आहे.

पण ह्या उलट जर भारत आणि पाकिस्तान यांच्यात अणुयुद्ध झाले तर.... नेहमीप्रमाणे आगळीक पाकिस्तान करेल. पाकिस्तानी सैन्य क्षेपणास्त्र भारताच्या दिशेने सोडण्याचे ठरवतील. त्यांना त्यांच्या सरकारची परवानगी घेण्याची आवश्यकता नसते.

भारतीय तंत्रज्ञान खूपच प्रगत असल्याने ८ सेकंदात त्यांना पाकिस्तानी योजना कळेल आणि भारतीय सैन्य लगेच प्रत्युत्तराला तयार असेल.

पण या साठी त्यांना भारत सरकारची परवानगी घ्यावी लागेल. त्यासाठी ते राष्ट्रपतींना विनंती करतील. राष्ट्रपती सैन्याची विनंती मंत्रिमंडळाकडे पाठवतील. पंतप्रधान लोकसभेची आपत्कालीन बैठक बोलावतील. परंतु लोकसभा अनेक मुद्यांवरून उदा. प्रांतिक, भाषिक, धार्मिक इ. वरून स्थगित होईल. विरोधी पक्ष सभात्याग करतील, वा लोकसभा अध्यक्षांना घेराव घालतील. त्यांच्यावर कागदपत्रे फेकतील. या सर्व कारणांमुळे लोकसभा बेमुदत तहकूब होईल. राष्ट्रपती लवकर निर्णय होण्यासंबंधी पुन्हा पंतप्रधानांना स्मरणपत्र पाठवतील.

मधल्या काळात तांत्रिक दोषामुळे पाकिस्तानी क्षेपणास्त्र आकाशात झेप घेण्यास असमर्थ होईल पण त्यांचे प्रयत्न सुरूच राहतील.

भारतात सत्ताधारी पक्षाला बाहेरून पाठिंबा देणारे एक-दोन पक्ष पाठिंबा काढून घेतील. सरकार अल्पमतात जाईल. राष्ट्रपती दोन आठवड्यांच्या आत सरकारला बहुमत सिद्ध करण्यास सांगतील. पक्षांतराला ऊत येईल. खासदारांची खरेदी-विक्री सुरू होईल. यालाच 'घोडेबाजार' असेही म्हणतात. सत्ताधारी पक्ष बहुमत सिद्ध न करू शकल्याने राष्ट्रपती काळजीवाहू सरकार नेमतील.

काळजीवाहू सरकारचे पंतप्रधान सैन्याला क्षेपणास्त्र वापरण्याची परवानगी देतील, पण निवडणूक आयोग काळजीवाहू सरकारला असा निर्णय घेण्याचा अधिकार नाही असे कळवतील. कारण लोकसभेच्या निवडणूका जाहीर झालेल्या असतील.

सरकार निवडणूक आयोगाविरूद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करेल. त्यात निवडणूक आयोग आपल्या अधिकारकक्षेच्या बाहेर वागत आहे असे म्हणेल.

सर्वोच्च न्यायालय पंतप्रधानांच्या मदतीला धावून येईल. काळजीवाहू सरकारचे पंतप्रधान आपत्काळात देशहितासाठी असा निर्णय घेऊ शकतात असा निर्णय देईल.

त्यानंतर एक पाकिस्तानी क्षेपणास्त्र यशस्वीपणे आकाशात झेप घेईल पण ते त्याच्या निर्धारित लक्ष्यापासून ३६७ कि.मी. जवळ म्हणजे त्यांच्याच एका सरकारी कार्यालयावर सकाळी ११ वाजता कोसळेल. पण सुदैवाने कोणीही सरकारी कर्मचारी इतक्या लवकर कामावर येत नसल्याने जीवित हानी टळेल.

काय चूक झाली हे पाक शास्त्रज्ञांना कळणार नाही म्हणून ते चीन व अमेरिकेकडे मदतीची याचना करतील.

भारत सरकार क्षेपणास्त्र वापरासाठी शेवटी परवानगी देईल. ही परवानगी मिळेपर्यंत तीन महिन्यांचा कालावधी संपलेला असेल.

परवानगी मिळाली असे कळल्याबरोबर मानव अधिकार व अणु युद्धाविरूद्धचे कार्यकर्ते जागे होतील व सरकारच्या ह्या निर्णयाविरूद्ध मानवी साखळी करून पार्लमेंटला घेराव घालतील. देशात ठिकठिकाणी शांतता प्रेमी लोक रस्ता रोको - रेल रोको आंदोलन सुरू करतील. त्यांच्यावर पोलिस लाठीमार-गोळीबार करतील ; कार्यकर्ते बसेस व रस्त्यावर उभी असलेली वाहने जाळतील.

पाकच्या बाजूने क्षेपणास्त्रांचे प्रक्षेपण जारी राहील परंतु यांत्रिक दोषांमुळे ते लक्ष्यांऐवजी भलतीकडेच कोसळतील, काही अरबी समुद्रात कोसळतील. काही मासे मरतील. मग पाकिस्तान अमेरिकेने तयार केलेली क्षेपणास्त्रे सोडील पण त्यांच्या वापराचे तंत्र न समजल्याने ते जेथून उडाले तेथेच कोसळतील. काही त्यांच्या मूळच्या लक्ष्यावर म्हणजे रशियावर जातील, पण रशिया सावध असल्याने ती पुन्हा परत येऊन इस्लामाबादवर कोसळतील पाकिस्तानात हाहाकार माजेल. भरपूर जीवित व वित्तहानी होईल. पाकिस्तान जगाकडे मदतीची याचना करेल.

भारत सरकार तीव्र दु:ख व संवेदना व्यक्त करेल व मदतीचा पहिला हप्ता म्हणून १०० कोटी रु.ची मदत जाहीर करेल. शिवाय काही टन पार्ले जी बिस्किटस् समझोता एक्सप्रेसने रवाना करेल.

अशा तऱ्हेने भारताला क्षेपणास्त्र सोडण्याची वेळ येणार नाही आणि पाकिस्तानला जे साधायचे असेल ते साधता येणार नाही आणि दोन्ही देशात पुन्हा तात्पुरती शांतता प्रस्थापित होईल. जयहिंद !

**- वसंत धुपकर,** पुणे. भ्रमणध्वनी - ०९९७५८४५६९०

## j वीरमरण

प्रेत त्याचे जळताना मी पाहिले
अश्रूंचे कितीक ते घरी पाट वाहिले !
राष्ट्रासाठी जगताना त्याने आयुष्य वाहिले
चार ओळींचे भाषण वाचून सारे संपले !
राहिली त्याचे मागे एक झोपडी
माय, तात, पत्नी आणि मुले बापुडी !
खेद नाही खंत नाही सारा समाज चालला
भविष्य सारे प्रश्नांकित करूनी काळ थांबला !

**- अरविंद जोशी**, सांगली

## j संवाद लेख स्पर्धा २००९

दर वर्षीप्रमाणे यंदाही लेख स्पर्धा २००९ जाहीर करताना विशेष आनंद होत आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त सभासद/सहसभासद भाग घेऊन ती यशस्वी करतील अशी आशा आहे.

स्पर्धेसंबंधी माहिती -

**१) विषय -** * सेवानिवृत्ती झाली - पुढे काय ?
किंवा
* माझ्या कल्पनेतील सुखी संसार

**२) शब्द मर्यादा -** आठशे ते एक हजार शब्द.

**३) लेख पाठवण्याची अंतिम मुदत -** ३१ मार्च २००९.

स्पर्धेसाठीचे सर्व लेख ३१ मार्च २००९ पर्यंतच आमचेकडे पोचतील अशा बेताने पाठवावेत. कोणत्याही कारणास्तव अंतिम मुदत वाढविली जाणार नाही.

**४) पारितोषिकांचे स्वरूप -**

**पुरूष विभाग** - प्रथम क्रमांक - रू. ५००/-
द्वितीय क्रमांक - रू. ३००/-
तृतीय क्रमांक - रू. २००/-

**स्त्री विभाग -** प्रथम क्रमांक - रू. ५००/-
द्वितीय क्रमांक - रू. ३००/-
तृतीय क्रमांक - रू. २००/-

**इतर महत्त्वाच्या सूचना -**

१) ही स्पर्धा केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशनच्या सर्व सभासदांसाठी व सहसभासदांसाठीच आहे.

२) लेखन आखीव फुलस्केप (पांढरा कागद) कागदावरच भरपूर समास सोडून, दोन ओळीत जास्त अंतर सोडून कागदाच्या एकाच बाजूस लिहिलेले असावे. पाठपोट लिहू नये. अक्षर वाचनीय असावे. लेखाच्या सुरूवातीस उजवीकडील कोपऱ्यात लेखकाने आपले संपूर्ण नाव, पूर्ण पत्ता (पिनकोडसहित) सभासद क्रमांक, तारीख, फोन नंबर लिहावा. लेखाच्या शेवटी आपली सही, त्या खाली, संपूर्ण नाव, पूर्ण पत्ता, फोन नंबरसहित लिहिणे आवश्यक आहे.

३) लेखाची मूळ प्रतच पाठवावी. झेरॉक्स, कार्बनप्रत पाठवू नये.

४) स्पर्धेसाठी लेख पाठविताना पाकिटावर मोठ्या अक्षरात **'संवाद लेख स्पर्धा २००९'** असा स्पष्ट उल्लेख करून पुरेसे पोस्टेज लावूनच असोसिएशनच्या पुणे येथील पत्त्यावर पाठवावा. लेखाबरोबर इतर साहित्य, असोसिएशन संबंधीचा मजकूर पाठवू नये. त्यासाठी स्वतंत्र पाकिट पाठवावे.

**५) ज्या सभासदांना/सहसभासदांना 'संवाद' लेख स्पर्धेत यापूर्वी पारितोषिक मिळाले आहे अशा सभासदांनी लेख पाठविल्यास त्याचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही.**

लेखनासंबंधीच्या वरील सर्व सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. सूचनांचे उल्लंघन करून पाठवलेल्या लेखांचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही याची लेखक सभासदांनी नोंद घ्यावी.

संपादक मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

स्पर्धेचा निर्णय मे २००९ च्या 'संवाद' मध्ये प्रसिद्ध होईल. विजेत्यांना पारितोषिके या वर्षीच्या सर्वसाधारण सभेत अध्यक्षांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील.

**- संपादक मंडळ (संवाद)**

## विज्ञान आणि अध्यात्म

विज्ञान प्रयोगातून विकसित होते, अध्यात्म योगातून प्राप्त होते
विज्ञानासाठी साधने वापरली जातात, अध्यात्मात साधना वापरली जाते
विज्ञानामध्ये शोध आहे, अध्यात्मात बोध आहे
विज्ञानात तत्त्वपरीक्षा आहे, अध्यात्मात स्वत्वपरीक्षा आहे.
विज्ञानात व्यासंग आहे, अध्यात्मात सत्संग आहे.
विज्ञानात कर्तृत्व आहे, अध्यात्मात दातृत्व आहे.
विज्ञानात शक्ति आहे, अध्यात्मात भक्ति आहे.
विज्ञानात भौतिकता सुधारते, अध्यात्मात नैतिकता सुधारते.
विज्ञानात प्रकल्प आहेत, अध्यात्मात संकल्प आहेत.
विज्ञान उपभोगास पोषक आहे, अध्यात्म त्यागास पोषक आहे.
विज्ञानात तंत्रज्ञान आहे, अध्यात्मात तत्त्वज्ञान आहे.
विज्ञानामुळे पुरुषार्थ घडतो, अध्यात्मामुळे परमार्थ घडतो.
विज्ञानामुळे प्रतिष्ठा वाढते, अध्यात्मामुळे निष्ठा वाढते.
विज्ञानामुळे संपन्नता प्राप्त होते, अध्यात्मामुळे प्रसन्नता प्राप्त होते.
विज्ञानामुळे प्रसिद्धी मिळते, अध्यात्मामुळे सिद्धी मिळते.
विज्ञानामुळे परिस्थिती बदलते, अध्यात्मामुळे मन:स्थिती बदलते.
विज्ञानाने क्षणिक आनंद मिळतो, अध्यात्माने निरंतर आनंद मिळतो.
विज्ञानाने जीवनास गती मिळते, अध्यात्माने जीवनास दिशा मिळते.
विज्ञान हव्यासाची पेरणी करते, अध्यात्म ध्यासाची पेरणी करते.
विज्ञानात उपकरणांची, अध्यात्मात अंत:करणाची आवश्यकता असते.
विज्ञानात तपशिलावर तर, अध्यात्मात तप व शीलावर भर असतो.
विज्ञानात पराक्रम आहे, अध्यात्मात आत्मसंयम आहे.
विज्ञानाने नवसृष्टी विकसित होते, अध्यात्माने नवदृष्टी विकसित होते.
विज्ञानाने स्वार्थ फोफावतो, अध्यात्माने परमार्थ विकसित होतो.
विज्ञानाने बाह्यसुख मिळते, अध्यात्माने अंतरात्म्यास सुख मिळते.
विज्ञानाने अनेक प्रश्न निर्माण होतात, अध्यात्माने प्रश्न सुटतात.
विज्ञानाने हिंसेला तर, अध्यात्माने अहिंसेला प्रोत्साहन मिळते.
विज्ञानाने कार्यास चालना मिळते, अध्यात्माने स्वधर्मास चालना मिळते.
विज्ञान आमचा विश्वास आहे, अध्यात्म आमचा श्वास आहे.

संग्राहक - **अनिल खाडिलकर,** एरंडवणा, पुणे ४

## j ६५ वी कला - समाधान

''रसनेशी वळण लावा, साठीत नाम मेवा ।
स्वरुपी मिळावयाला, श्रीराम राम बोला ।।''

सर्वच संतांनी नामाचा महिमा गायला आहे. पण नामस्मरण करायला सुरूवात करण्याचा काळ 'साठी' नव्हे हं! अहो, दंताडीचा पत्ता नाही. अशा वेळी 'राम-राम' च्या ऐवजी 'लांब-लांब' असे शब्द ऐकू यायचे.

सुखाचा शोध घ्यावा लागतो, आनंद मानावा लागतो. एक कवी म्हणतोच की,

''घरसे चले थे हम तो खुशीकी तलाश में ।
गम राह में खडे थे, वो ही साथ हो लीये ।।''

सर्वांनाच फुलं, सुख हवे तर काट्यांनी, दु:खाने कुठे जायचे ? येणारच ते सोबतीला. त्यांचेही स्वागत करणे जमायला हवे.

कोणत्याही वयाचा माणूस पूर्ण सुखी नसतोच. आजही लहान मुलांचे ताणतणाव पाहिले की वाटते, आपला काळ बरा गेला. १०० धागे दु:खाचे असले तरी एक धागा सुखाचा असतोच. त्याला पकडता आले तर जीवन बदलते. आपल्याला नेहमीच इतरांच्या बोलण्यातून संकेत मिळत असतात. ते आत्मसात करता आले तर मग त्यातूनच जीवनाचे उद्दिष्ट गवसते.

आपण खूप वेळा खाली मान घालून रस्त्याने चालत असतो, आपल्याच विचारात (हो रस्त्यावरचे खड्डेही चुकवायचे असतात नाहीतर 'जाना था बाजार, पहुँच गये अस्पताल' असे व्हायचे.) अचानक आकाशाकडे लक्ष जाते. मावळत्या सूर्याने केलेली रंगांची उधळण दिसते. काळ्या-पांढऱ्या ढगांचे विलोभनीय चित्र दिसते व ओठांवर शब्द येतात 'Oh ! What a beauty !' हा क्षणाचा आनंदच ऊर्जेचे काम करतो.

आमच्यावर कुणी प्रेमच करत नाही म्हणणारे खूपजण असतात, पण आपल्याला कुणाबद्दल प्रेम वाटते का ? म्हणजे समोरच्या व्यक्तीला त्याच्या गुणदोषांसकट स्वीकारणे आपल्याला तरी जमते का ? आपण समोरच्या व्यक्तीला आपल्या मनाप्रमाणे वागण्याचा आग्रह करतो व Action-Reaction चा खेळ सुरू होतो.

''प्रेम सहवासाने जडते व पडते ते प्रेम नसते.
विरहाने ते वाढते व सादाला प्रतिसाद मिळाला तर ते दुप्पट होते.''

उत्साह तर बळे बळे आणावा लागतो. म्हणून तर मराठी माणूसच नव्हे तर एकूणच मनुष्य प्राणी उत्सवप्रिय आहे. What life is this, if full of tears, we have no time to stand and stare. अशा विचारांनी आम्ही हासूच विसरायला लागलो आहोत. खोटे खोटे हासत, 'हास्यक्लबा'त जात अशी आशा करतो की एक दिवस तरी आम्ही खळखळून मनापासून हसू शकू.

खूप प्रसंगांच्या बाबतीत आपण 'जाऊ दे, चलता है' असेच धोरण ठेवतो. पण ही साठवणच एखाद्या क्षणी चीड होऊन बाहेर पडते. साठीनंतर मग तो स्वभावच बनू लागतो.

एकूणच सकारात्मक/नकारात्मक विचार अशी विभागणी नसते. तरुणपणातच दासबोध, गीता, मनाचे श्लोक अशा ग्रंथांचे वाचन सुरू केले तर फायदा होतो. या वयातच भीती, द्वेष, क्रोध, दु:ख या भावना तीव्र स्वरूपात प्रगट होतात. त्यांचा शरीरावर परिणाम होतो. अशावेळी संगत जशी मिळेल त्याप्रमाणे वाईट सवयी, अरेरावी, विध्वंसक वृत्ती वाढू शकते.

घटाघटाचे रूप आगळे आहे. प्रत्येकाचे दैव वेगळे आहे म्हणून तर जग सुंदर आहे. हे पटले तर हेवा/मत्सर मनाला स्पर्श करत नाहीत. मला वाटते जगात ६४ नव्हे तर ६५ कला आहेत. समाधानी रहायला शिकणे-शिकवणे हीच ती पासष्टावी कला!

कर्ता करविता जसा कुणी आहे तसाच बोलता बोलविताही कुणीतरी आहेच. श्रद्धा-सबुरी यांची जरूर असते. मला वाटते, आयुष्य म्हणजे एक नाटक आहे, इथे Entry ला जेवढे महत्त्व तेवढेच Exit ला सुद्धा आहे. कुणी शहीद होतो, तर कुणाचे Encounter. कुणाच्या बाबतीत 'सुटला बिचारा' तर कुणाच्या बाबतीत 'अरेरे फारच लवकर गेला' अशा comments ऐकू येतात. आपल्या वाट्याला आलेली भूमिका करत रहायची. आजचा सूर्य बघायला मिळाला ह्यातच समाधान मानायचे. त्या श्रेष्ठ दिग्दर्शकाला म्हणायचे:

''तूच देऊळ आहेस व मूर्तीही तूच आहेस.
आरती, पूजा, भक्ती सारे तूच आहेस.''

**- सौ.वर्षा शरद जोशी,**
३२, 'मकरंद', रघुवीर सोसा., डोंबिवली (पू.)

## 0 अभिनंदनीय

आपले सदस्य **श्री.शामकांत नारायण पटवर्धन** (वय वर्षे ७५) यांना 'डी एस के विश्व के सितारे' या डी एस के डेव्हलपर्स तर्फे नुकत्याच घेण्यात आलेल्या वैयक्तिक गायन स्पर्धेतील वय वर्षे ६५ ते ७५ या वयोगटासाठीचे रु.१५०००/- चे प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. सदर पारितोषिक वितरण समारंभ डी एस के विश्वच्या भव्य प्रांगणात दि. ४ जानेवारी २००९ ला अनेक मान्यवर कलावंतांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी श्री.पटवर्धन यांनी 'देह देवाचे मंदिर' हे नाट्यगीत सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळविली.

श्री.शामकांत पटवर्धन यांचे असोसिएशनच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

**- सेक्रेटरी**

## j लेक लाडकी या घरची होणार ना... होणार ना.... मी ?.....

हा प्रश्न आहे अनेक गावांच्या गर्भातील स्त्री भ्रूणांचा....

माता न तू वैरिणी.... हा आक्रोश ऐकू येतो आहे... या स्त्री भ्रूणांचा... त्या अगतिक मातांच्या गर्भातून... अबोल असून देखील.. कळी उमलण्याआधीच खुडून जाणाऱ्या त्या निष्पाप जिवांचा... अभागी फुलांचा आक्रोश..... ना चंद्र पाहिला ना सूर्य.... अनुभवली फक्त मातेच्या उदराची उब..... तीही अल्पकाळ आणि नंतर अनुभवलं ते डॉक्टरांचं शस्त्रं.... खेळ खलास...

आजकाल एखाद्या स्त्रीला आपण आई होणार हे कळल्यानंतर खूप आनंद होतो. कौतुकाचे वर्षाव होतात. आपण मातृत्व अनुभवणार या सुखद विचाराने ती हरखून जाते. आकाश ठेंगणं वाटू लागतं. पण हे सर्व क्षणभंगूर ठरतं... ती स्त्री दुसऱ्याच विचारांत गढून जाते.... तिच्या आनंदाची जागा हा गूढ विचार घेतो.

हा गूढ विचार (?) असतो... आपण गर्भ लिंगपरीक्षण करून घ्यायचं आणि होणारं अपत्य मुलगी असल्यास फुटलेला अंकूर खुडून टाकायचा.... गर्भपात करावयाचा..... आणि सासू, सासरे, पती यांच्या मनासारखं होऊ द्यायचं... मातृत्व सोडून द्यायचं.

खरे पाहता असा विचार करणं हा ज्याचा त्याचा खासगी प्रश्न आहे. परंतु अशा अनेक कुटुंबातील अनेक अर्धांगिनींच्या अविचारामुळे स्त्रीभ्रूणहत्यांचे होणारे दुष्परिणाम जसजसे समाजाला जाणवू लागले तसतसे समाज सुधारक, राजकारणी मुत्सद्दी अस्वस्थ होऊ लागले. मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या कमी होऊ लागली. कायद्याने त्यावर बंदी आणावी लागली. परंतु कायद्यांनी सर्वच गोष्टी साध्य होतात असे नाही. स्त्रीभ्रूणहत्या का नको हे सांगण्यासाठी, समाजातील संबंधितांच्या गळी उतरविण्यासाठी समाज प्रबोधनाच्या अभियानाची गरज आहे. असे अभियान सातत्याने राबविण्याची आवश्यकता आहे.

सध्या स्त्रीभ्रूण हत्या विरोधी मोहीम युद्ध पातळीवर चालू असून ती तशी चालू ठेवण्याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. 'लेक वाचवा देश वाचवा' - 'आई मला खुडू नकोस' अशा घोषणा आवश्यक आहेत. या संबंधीचे जे कायदे अस्तित्वात आहेत त्या कायद्यांची कडक व काटेकोरपणे अंमलबजावणी करणे व गरज भासल्यास नवीन कायदे करण्यास सरकारने कटिबद्ध असले पाहिजे. मुलींची संख्या मुलांच्या तुलनेत कमी झाल्याने बळाच्या जोरावर बोहल्यावरील वधूला पळवून नेणाऱ्या घटना वारंवार घडू लागतील... ही झाली या समस्येची एक बाजू.

या विषयाची दुसरी विदारक बाजू देखील लक्षात घेतली पाहिजे. एखादी गर्भवती स्त्री गर्भलिंगचाचणी करून घेऊन, होणारे अपत्य मुलगी आहे हे निश्चित कळल्यानंतर मातृत्व झिडकारण्याच्या निष्कर्षाप्रत का येते व मुलगी का नको म्हणते याची कारणे काय असू शकतात याचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. ती कारणे जरी समूळ नष्ट करता आली नाहीत तरी त्यांची होणारी वाढ रोखणे आपल्या हातात आहे. याची जणीव करून देणे हा उद्देश या लेखाचा आहे. आत्ताच जर योग्य नियोजनाने अत्यावश्यक हालचाली केल्या नाही तर पुढील अनेक दशके आपणास याचे दुष्परिणाम सोसावे लागतील. सबब अत्यंत योजनाबद्ध, दीर्घकालीन, समाजातील सर्व घटकांच्या समाज प्रबोधनाची गरज आहे.

स्त्रीच्या पोटात जसजसा गर्भ वाढत जातो तस तसे तिच्यावर तिचा नवरा, सासू, सासरे यांचा दबाव वाढू लागतो. आम्हाला पहिला मुलगाच पाहिजे किंवा मुलीच्या पाठीवर परत मुलगी नको असा अट्टाहास सासरच्या लोकांकडून धरला जातो. प्रसंगी वाद विवाद होतात. परिणामी तिच्या मनात आपल्या पोटात मुलगा आहे की मुलगी आहे हे जाणून घेण्याची जिज्ञासा घर करू लागते. गर्भ लिंग चाचणी करावयाची या तिला नको असलेल्या निर्णयाप्रत नेऊन ठेवलं जातं.... मुलगी झाली तर आपल्या समोर काय वाढून ठेवले आहे याचा पाढा वारंवार वाचला जातो आणि मुलगी आहे असे निदान झाल्यानंतर जिने अद्याप हे जग पाहिलेलेही नाही त्या मुलीच्या भवितव्याबाबत नको ते वाईट विचार डोकावू लागतात आणि तेथूनच ते अपत्य नकोच या अनैसर्गिक अविचाराप्रत ती येवून पोहोचते....

मुलगी का नको या संदर्भात पुढील महत्त्वाच्या कारणांचा विचार करणं आवश्यक वाटते -

१) हुंड्याची चिंता - मुलगी का नको याचे सर्वात महत्त्वाचे कारण आहे मुलीच्या लग्नातल्या हुंड्याची चिंता... लग्न सोहळा हा आनंदी सुखदायी न राहता त्याने राक्षसी स्वरूप धारण केले आहे. मुलाचे लग्न म्हणजे २०/२१ वर्षांनी लागलेली नैसर्गिक लॉटरीच आहे असे वराच्या माता पित्यांना वाटू लागले आहे. हुंड्याची मागितलेली रक्कम ही मुलाची किंमत आहे हे त्या वराचे माता पिता विसरतात. हुंडा मानपान ही बुरसटलेली व अनावश्यक कल्पना सोडून देण्यास वराचे आई वडील सहसा तयार होत नाहीत ही खरी दुःखाची बाब आहे. मुलाची आई 'आमच्या मुलीच्या लग्नात तुम्ही का हो पुढे आला नाहीत... त्यावेळेस कुठं गेलं होतं तुमचे हे शहाणपण... नाहीतर मी कशाला झाले असते अशी लंकेची पार्वती'... असा बिनतोड सवाल करताना दिसते. ह्याला आपला समाजच सर्वस्वी जबाबदार आहे. हा पुरुषप्रधान संस्कृतीचा व 'मला वेगळं व्हायचं आहे.' या मनोवृत्तीचा बळी आहे. त्याला फक्त मान-पान या साळसूद नावाने ओळखलं जातं. तो फक्त तो फास्ट ट्रॅक आहे.. हेच मान पान पुढं मानापमान म्हणून पडद्यावर येतं भयंकर रूप घेऊन....

२) मुलगी वयात आल्यावर - आपली मुलगी शाळेत - कॉलेजला जाऊ लागली की तिच्यावर कोणी माथेफिरू एकतर्फी प्रेम करून तिला त्रास देईल का, तिने लग्नास नकार दिला म्हणून तिच्या तोंडावर ॲसिड फेकेल का, अमृता, रिंकू सारखा निघृण खून करेल का ? या विचाराने ती आणखी अस्वस्थ होते... तिला कोणतीच गोष्ट नीट

समजत नाही, उमजत नाही.

३) लग्न ठरविताना- मुलीच्या लग्नात सासरच्या लोकांनी भरमसाठ हुंडा, सोने मागितले तर एवढा पैसा आणायचा कोठून ? कसा उभा करावयाचा ? सासरच्या अमूक लोकांची जेवणाची राहणेची सोय कशी व कोठून करायची ? कार्यालये तरी कुठे मिळणार ? हे आणखी पुढचे प्रश्न तिला सारासार विचार करण्या पलिकडे नेवून ठेवतात.

४) सासरचे लोक - अगदी मनासारखं लग्न करून दिलं तरी सासू, नणंद, जाऊ, दीर, सासरा हुंडा कमी दिला, आमचा मानपान आमच्या मनासारखा केला नाही, जावयाला दिवाळीला पिवळं केलं नाही, स्कूटर-मोटारसायकल घेवून दिली नाही, या वा अन्य कारणावरून जाच, मारहाण सुरू केली तर मुलीचं कसं होईल? आणि हे सगळं नको. माझ्या आई वडिलांना म्हतारपणी त्रास नको असं म्हणत माझ्या मुलीने जीवाचं काही बरं वाईट केलं तर ?

आपण जर का एकदा मुलीला जन्म दिला म्हणजे वरील सर्व संकटांना तोंड द्यावे लागणार या सासरच्या लोकांनी उभ्या केलेल्या काल्पनिक भीतीपोटी स्त्री भ्रूण गर्भवती सून निराश होत जाते. तिला आशेचे किरण, किनारा दिसत नाही. ती अगतिक होते व शेवटी नाईलाजाने तिला तो स्त्री बीज अंकूर खुडून टाकावा व आपली कायमची सुटका करून घ्यावी या ठाम विचाराप्रत ती येऊन ठेपते व सुस्कारा टाकते.

आमचा या प्रश्नाशी काही संबंध नाही होऽ, आम्हाला दोन्ही मुलेच आहेत, मुली नाहीतच असा विचार जर मुलाचे पालक आज करीत असतील तर ते सुपातल्या दाण्यासारखे आहे. उद्या त्यांच्या मुलांची लग्ने झाल्यावर त्यांच्या सुनांना दिवस गेल्यावर ह्याच जात्यांतून त्यांना जावे लागणार आहे. वरचे सर्व यक्ष प्रश्न त्यांनाही भेडसावणार आहेत. कारण त्या सुनादेखील याच समाजाचा घटक आहेत.

यात चूक कोणाची ? दोषी कोण ? ती अभागी माता ? की तिच्या मनात असे विचार भरविणारे सासर ? की खऱ्या अर्थाने या पुढे नाईलाजाने स्त्रीभ्रूण निपटून टाकावे अशा विचाराप्रत तिला ओढून नेणारी पुरुषप्रधान संस्कृती ? आपण सर्वांनीच असा दूषित समाज निर्माण केला आहे. त्या समाजाची मानसिकता आपणच बिघडवलेली आहे. मग आपण त्या समाजाची मानसिकता बदलू शकतो.

समाजाची मानसिकता बदलणे म्हणजे तरी काय ? सत्ता, पैसा, शिक्षण, देखणेपण यामुळे आलेल्या अहंगंडाचा, मीपणाचा दांभिक चष्मा नाकावरून उतरून डोळसपणे जगाकडे पाहायचं व आपण प्रत्येकजण या समाजाचा एक सामान्य पण जबाबदार घटक आहोत. समाजाचे ऋणी आहोत. त्या ऋणाचे पांग फेडावयाचे आहेत याची जाणीव ठेवून स्त्री जातीचा छळवाद सोडून तिला योग्य ते स्थान द्यावयाचे असे झाल्यास समजााची दूषित मानसिकता बदलण्याची नांदी या विषयापुरती झाली असे मी मानेन.

आजपासून गुडघ्याला बाशींग बांधण्याची घाई झालेल्या वर-मुलाने व त्यांच्या आई वडीलांनी माझा मुलगा इंजिनिअर वा डॉक्टर (कितीही डोनेशन भरलेले असले तरी) असो त्याच्या लग्नात हुंडा मागणार नाही. तसेच वधूपित्याने आपल्या मुलीच्या लग्नात हुंडा देणार नाही असा दृढ निश्चय करावा.

पत्नीचा छळ करणार नाही. तिला अंतर देणार नाही. सवत आणणार नाही अशी ग्वाही पतीने द्यावी. सासू ही माझी आई आहे नणंद ही माझी बहीण आहे असा विश्वास निर्माण करण्यासाठी प्रत्येक सुनेने कंबर कसावी.

सून ही माझी मुलगीच आहे असा विश्वास निर्माण करण्यासाठी प्रत्येक सासूने कटिबद्ध व्हावे. शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी शाळेतील, वर्गातील मुलगी ही आपली भगीनी आहे असे समजून वागायचा निश्चय करावा. फ्रेंडशीप डे ला राखी पौर्णिमेचे महत्त्व द्यावे. म्हणजे स्त्रीभ्रूणहत्येमागची ज्ञात कारणेच नष्ट होतील व आपोआपच स्त्री भ्रूणहत्येला आळा बसेल. समाजाच्या ऋणातून काही अंशी उतराई झाल्याचा निर्भेळ आनंद प्रत्येकाला मिळेल. यासाठीच गरज आहे ती समाजातील सर्व घटकांच्या अत्यंत योजनाबद्ध व दीर्घकालीन 'मुलगी हवी हो' अशा अभियानाची.. समाज प्रबोधनाची!

अन्यथा 'चल गं सखे वारुळाला, नागोबाला पूजायाला' ह्या अस्सल ग्रामीण गीतापासून आपण पोरके होवू. वटसावित्रीला प्रसन्न करून हाच नवरा जन्मोजन्मी लाभू दे असा वर मागण्यासाठी वड-पिंपळाच्या वृक्षाभोवती फेऱ्या घालणाऱ्या नाकात नथ व नऊवारी काठापदराची साडी नेसलेल्या सौभाग्यवती, लेकी, सुना दिसणार नाहीत. झिम्मा, फुगडी खेळत हादग्याभोवती पिंगा घालणाऱ्या बालिका दिसणार नाहीत. नवरात्रोत्सवात संगीताच्या तालात स्वतःला हरवून दांडिया खेळणाऱ्या स्त्रिया दिसणार नाहीत व ज्या मुलाच्या अट्टाहासासाठी ज्या मातेने स्त्री भ्रूणाचा त्याग केला त्या मातेच्या सुपुत्राला वधू मिळणे अवघड होवून जाईल ही खरी शोकांतिका आहे स्त्री भ्रूण हत्त्येच्या कथेची.

**- ॲड.श्री प्रभाकर माळगे,** सांगली ४१६४१६.
भ्रमणध्वनी - ९४२२४११९५५.

## "आपले सण आणि आयुर्वेद"

'संवाद' च्या डिसेंबर २००८ च्या अंकात वरील पुस्तकाचा परिचय छापला आहे. आपले सभासद श्री.मनोहर शंकर जोशी (नाशिक) यांचे चिरंजीव वैद्य मनीष जोशी यांनी हे पुस्तक लिहिले असून जिज्ञासूंनी अधिक माहितीसाठी -

दूरध्वनी क्र. - (०२५३) २३२६६१९
भ्रमणध्वनी क्र. - ०९४२०४६२०६५

या क्रमांकांवर संपर्क साधावा.

**- संपादक**

# j मोरजाई

कोल्हापूर पासून गगनबावडा हे गाव ५५ किलोमीटरवर आहे. हे गाव उंच डोंगरमाथ्यावर आहे. डाव्या हाताला करूळ घाट आहे. तर उजव्या हाताला बावडा घाट आहे. दोन्ही घाट कोकणात जातात. येथून पूर्वेकडे नजर टाकल्यास दूर अंतरावर उंचच्या उंच एक प्रचंड मोठा मोरजाईचा डोंगर दिसतो. येथून आजूबाजूचा खूप लांबवरचा प्रदेश नजरेच्या टप्प्यात येतो. या डोंगराच्या पायथ्याशी 'बोरबेट' हे गाव आहे. हे गाव समुद्र सपाटीपासून १५०० फूट उंचीवर आहे.

गगनबावडा ते बोरबेट हा रस्ता पूर्वी कच्चा होता. आता डांबरी रस्ता केला आहे. या परिसरात खूप पाऊस पडत असल्यामुळे डांबरी रस्ते टिकत नाहीत. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये येथे सर्वाधिक पाऊस पडतो. हा सारा भाग घनदाट अरण्याने व्यापलेला आहे. गगनबावडा पासून ४ किलोमीटर अंतरावर आल्यावर धनगरवाडा लागतो. येथून वेड्यावाकड्या वळणाऱ्या चढाच्या घाटाला सुरूवात होते. येथून चालत जात असताना कधी खोल दरी लागते तर कधी उंचच उंच डोंगर लागतो. डोंगर परिसरातून दरीकडे पहाताना मन पूर्णपणे तल्लीन होते. या वनश्रीकडे पाहताना असे वाटते की कुणीतरी अफाट मोठा लांबी-रुंदीचा हिरवागार गालीचा आकाशातील 'परी'चे स्वागत करण्यासाठी पसरून ठेवलाय. मधूनच दरीतून पक्ष्यांचा किलबिलाट, उंच झाडीतून कोकिळेचा मधुर आवाज, तर दुरून मोरवाड्यातून येणारा मोरांचा आवाज. सारेच कांही स्वर्गीय सुख देणारे. मंत्रमुग्ध वातावरण. या भारावून टाकणाऱ्या विश्वातून आपण बोरबेटला केव्हा येऊन पोहोचतो समजतच नाही. हे गाव गर्द झाडीतच लपलेले आहे. या गावात आश्रमशाळा आहे. या शाळेमुळे त्या गावाला खूप महत्त्व आहे. आजूबाजूच्या वाडीतील व छोट्या गावातील बरीच मुले या शाळेत शिकत असतात. शेजारील जिल्ह्यातील मुले ही येथे आहेत. या गावावर कृपावंत मोरजाईचा डोंगर व देवी माता मोरजाई यांचा शुभाशीर्वाद आहे.

बोरबेटपासून काही अंतरावर अगदी डोंगराच्या पायथ्याशी उजव्या बाजूकडील झाडीत राजघाट स्मशान आहे. तिथे पांडवकालीन राजवंशीय थोरा-मोठ्यांच्या समाध्या आहेत. येथून नागमोडी चढणीचा मार्ग चढत असताना पुरती दमछाक होते. शरीर थकून जाते. ऐतिहासिक दगडी पायऱ्या चढताना तर थोडावेळ विसावा घ्यावा लागतो. येथून पुढे गेल्यावर भव्य मोठे एखादे विमान उतरू शकेल असे पठार लागते. हे पठार अकराशे एकरवर पसरले आहे. यालाच मोरजाईचा सडा असे म्हणतात. येथून दूर अंतरावर मोरजाई मंदिराचा कळस दिसतो. चोहोबाजूकडे नजर फिरवली तर विहंगम देखावा दिसतो, अमावस्या व पौर्णिमेला सायंकाळच्या वेळी येथील सड्यावर वाघ येत असतो असे येथील महाराज म्हणतात. मंदिरातील परिसरात नैसर्गिकरीत्या तयार झालेल्या गुहेतून इतके थंडगार वातावरण आहे की अंगामध्ये थंडीने हुडहुडीच भरते. बाहेरील सड्यावर एप्रिल मे महिन्याच्या प्रखर उन्हात अनवाणी पाय ठेवणे म्हणजे विस्तवावर पाय ठेवण्यासारखा प्रकार आहे. पण आत गुहेतील परिसरात एअरकंडीशनला लाजवील इतके सुखद थंडगार वातावरण आहे. महाराज म्हणतात आम्ही येथे वास्तव्याला येण्यापूर्वी येथे सर्पांचेच राज्य होते. जिकडे पहावे तिकडे मोठाले सर्प होते.

भाविकांचे येथे आपुलकीने स्वागत केले जाते. चहापाण्याची सोय केली जाते. वेळप्रसंगी जेवणाचीसुद्धा सोय केली जाते. एकदा तर आम्ही सात आठ जण असताना महाराजांनी तासाभरात आम्हाला पुरणपोळीच्या जेवणाची सोय करून दिली. मंदिराकडे जात असताना मध्येच दरवाजाच्या चौकटीसारखी दगडात कोरलेली चौकट दिसते. त्यातून पुढे गेल्यावर तशीच दुसरी एक चौकट दिसते. पुढे मोरजाईचे मंदिर दिसते. देवळाच्या समोरच प्रांगणात दगडी प्रवेशद्वारावर दिसते. प्रवेश द्वारावर द्वारपालाची सुशोभित छायाचित्रे दिसतात. यातून पुढे गेल्यावर डाव्या बाजूला मोरजाई देवीच्या कृपेने फुललेली फुलबाग दिसते. उजवीकडे श्री जालिंदरमहाराज यांची समाधी आहे. मंदिरात आत गेल्यावर प्रशस्त दालन आहे. आतील वातावरण पवित्र, मंत्रमुग्ध करणारे आहे. समोरच श्री नामदेव महाराज शिवदास यांचे आसन आहे. त्यालगत विविध देव देवतांची छायाचित्रे दिसतात. मागील बाजूस श्री बाबूराव व इतर भक्तगणांचे आश्रय स्थान आहे. पश्चिम बाजूस पूर्वाभिमुख श्री मोरजाई मातेचे संपूर्ण दगडात कोरलेले मंदिर व मंदिरात मध्यभागी वाघावर आरूढ असलेली जरीचे हिरवेगार किंवा लाल नऊवारी पातळ, हिरवा किंवा लाल चुडा परिधान केलेली अठरा हस्तवर्धिनी श्री मोरजाईची मूर्ती दिसते. मोरजाई म्हणजेच साक्षात श्री नवचंडिका महिषासुरमर्दिनीचा अवतार होय. आम्ही सारेजण मातेसमोर नतमस्तक होवून साष्टांग दंडवत घातले.

मंदिरातून बाहेर आल्यावर दक्षिण दरवाजाच्या दालनात देव देवतांच्या कोरीव मूर्त्या व शिवलिंग दिसतात व पुढे वेताळ गाभारा दिसतो. येथून भुयारातून पुढे गेल्यावर दक्षिणेच्या बाजूला खोल दरी दिसते. तर समोर मानबेटचा सडा दिसतो. सभोवताली उंचच उंच डोंगर दिसतात. येथे शाहू महाराज नेहमी शिकारीला यायचे. असे म्हणतात की, श्री मोरजाईचे मंदिर हे पांडव कालीन मंदिर आहे. पांडव अज्ञातवासात असताना येथे वास्तव्यास होते. त्यांनी एका रात्रीत ह्या सड्यावर मंदिर बांधावयाचे ठरविले होते. परंतु मंदिर अर्धवट बांधून झाले असताना कोंबड्याने बांग दिली व दिवस उगवला. मंदिर पूर्ण बांधावयाचे तसेच राहून गेले व हिंस्र प्राण्यांची व सर्पांची येथे वसाहत निर्माण झाली. माघ महिन्यातील अमावास्या झाल्यानंतर सात दिवसांनी म्हणजेच रथसप्तमीला श्री मोरजाई मातेची मोठी यात्रा भरते. पुण्यामुंबईपासून ते कोकण कर्नाटकपर्यंतचे सर्व भाविक मंडळी आवर्जून दर्शनाला येतात. यात्रेत विविध धार्मिक कार्यक्रम व

एकूण आसपासच्या चौदा गावातून दिंड्या व पालख्या येतात. पूजाअर्चा धार्मिक प्रवचने होतात. या दिवशी पश्चिमेच्या कड्यावरून कोकण लगतच्या समुद्राकडे पाहिल्यास प्रत्यक्ष सोन्याच्या घागरीसारखा सुवर्णसूर्य समुद्रात बुडालेला दिसतो व समुद्रातील प्रकाश परावर्तनामुळे एकावर एक सात सुवर्ण घागरी वर निघतात असे विलोभनीय दुर्लभ दृष्य दिसते. हे पाहण्यासाठी पश्चिम कडेवर यात्रेकरूंची प्रचंड गर्दी दिसून येते हे दृष्य वर्षातून एकदाच पहावयास मिळते.

चैत्रशुद्ध १ गुढीपाडव्याच्या दिवशी सूर्योदयाला सूर्याचे प्रथम किरण श्री मोरजाईदेवीच्या मुखकमलावर पडतात. हे दृष्य पाहण्यासाठी भाविक आदल्या दिवसापासून मुक्कामाला असतात. प्रत्येक अमावास्येला देवीच्या दर्शनासाठी भाविकांची खूप गर्दी असते. या दिवसाचे महात्म्य खूप मोठे आहे.

गावातील व आश्रमातील आजूबाजूच्या परिसरातील सर्व भाविकांची मोरजाई देवीवर गाढ श्रद्धा आहे. तसा हा भाग अती उंचीवर आहे. पाऊस व थंडी येथे मरणाची आहे. पण देवी आपल्या सहाय्याला धावून येते अशी येथील जनतेची गाढ श्रद्धा आहे. ह्या देवतेला आम्हा हिमालयन ट्रेकर्स मंडळीचे साष्टांग दंडवत.

– **मारुती बसरीकट्टी,** कोल्हापूर

Rajguru Travels - Advertisement

## नववर्ष शुभकामना

O

प्रसन्नतेचे आज उषेने सूर नभी छेडिले ।
वाजत गाजत चैतन्याचे, नववर्ष अवतरले ।।
पक्षीगणांनी मधुर स्वरांनी, आसमंत भारले ।
कृपावंत त्या परमेशाचे, जणू स्तवन गायिले ।।
निष्क्रियतेचा अन्यायाचा, अंध:कार लोपला ।
मोदभरा अन् सृजनशील, हा उष:काल झाला ।।
उत्साहाने प्रमुदित होऊनी, कार्यरत होऊ या ।
जन्मभूमीवर स्तुती कीर्तीची, पखरण होऊ द्या ।।
कर्तृत्वाचा सोनचुरा हा, अखंड तळपत राहो ।
यशसिद्धीचा दीप्तिगोल तो, स्वयंप्रकाशित होवो ।।

– **उज्जवल ब्रम्हांडकर,** दादर, मुंबई १४

## j हाय...... !

शुभ्र ताटवे फुलले होते निळ्या वसंतात
मंद सुगंधा उधळित होता शीत-शांत वात
अधिर मनाने रमलो होतो तुझ्या प्रतीक्षेत
तोच अचानक खांद्यावरती विसावले तव हात !
सामोरी तू आलीस आणि फुलले हास्य क्षणात
कमलमिठीच्या पाशामध्ये धुंदावली जणु रात !
आसुसलेला स्पर्श तुझा अन् उष्णावलेले श्वास
शृंगाराच्या हिंदोळ्यावर रति-मदनाचा भास !
सुख-सोहळा तो वर्णु कसा मी नाही मनाला जाग
तनु-वीणेवर कुणी छेडला एक अनोखा राग !
रवि-तेजाची शीतलता की शशि-किरणांची आग ?
किंवा फुलली अधरसुधेच्या अमृतफुलांची बाग !
हाय, परंतु दिन ते गेले, गेले किती वसंत
भिरभिरणाऱ्या जीवनचक्रा नाही लाभली उसंत !
बुडता तरलो, जिंकित हरलो, जीवनगाणे गात
गात्रे शिणली, ऊर्मि निमाली जणु काळाची हो मात !
हिरवळ गेली, रंग उडाले, सरे दिव्याची वात
संध्याछाया गडद जाहल्या, दाटून आली रात !
आता नुरली मूर्त तुझी गं, हृदयमंदिरात
केवळ उरल्या जुन्या स्मृति अन् जखम अंतरात !

– **गोविंद करमरकर,** सांगली
दूरध्वनी : ०२३३-२३२०९११

# 0 स्वागत नववर्षाचे

निरोप देऊनी गतवर्षाला
स्वागत करुया नववर्षाचे
स्मरूनी क्षण ते सुखदु:खाचे
नव वर्ष ठरो आनंदाचे
स्वागत करुया नववर्षाचे ||१||

काही मोहरे गळून पडले
गोड आठवणी ठेऊनी गेले
कोणी सवंगडी नवीन आले
जणू हे क्षणची आनंदाचे
स्वागत करुया नववर्षाचे ||२||

सहल असो वा, ती कोजागिरी
भटकंती अन् स्वैर मुलुखगिरी
नित्य भेटुया प्रति बुधवारी
आम्ही मावळे कोल्हापुरचे
स्वागत करुया नववर्षाचे ||३||

वेध लागले संक्रांतीचे
लाडू खायचे तिळा-गुळाचे
जीवन जगण्या निवृत्तीचे
नववर्ष ठरो आनंदाचे
स्वागत करुया नववर्षाचे ||४||

A

**- प्रभाकर कानिटकर** कोल्हापूर
मोबाईल : ९८८११९९१९९

# अभिनंदनीय

सांगली येथील आपले एक सभासद श्री.प्रमोद राजदीप हे उत्तम जलतरणपटू असून त्यांनी लातूर येथे नोव्हेंबर २००८ मध्ये झालेल्या ११व्या राज्यस्तरीय प्रौढ जलतरण स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावून प्रौढ वयातसुद्धा आपल्या अंगी असलेल्या जलतरणकौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले, त्याबद्दल असोसिएशनतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!

**- सेक्रेटरी**

Tourways - Advertisement

# ० नववर्षानिमित्त....

नुकतेच दिनांक ३१ डिसेंबर ला रात्री १२ वाजता '२००८' हे वर्ष संपलं आणि १ जानेवारीला '२००९' या नव्या वर्षात आपण प्रवेश केला. दरवर्षीप्रमाणे आपण एकमेकांना शुभेच्छा देऊन नववर्षाचं स्वागत केलं आणि मागील वर्षातील कडू-गोड आठवणी मनात साठवून नवे वर्ष आपल्या सर्वांना सुख-समृद्धी-समाधान आणि सुरक्षितता देणारे जावो अशी प्रार्थना केली.

नववर्षाच्या आगमनाच्या निमित्ताने आमच्या मनात मात्र 'काळा' विषयीचं चिंतन सुरू झालं. काळाचं वर्णन 'अनादी' आणि 'अनंत' (म्हणजे ज्याला आदी नाही आणि अंतही नाही) असं केलं जातं ते उगीच नव्हे. कारण काळाचा आदी आणि अंत (अर्थात् प्रारंभ व शेवट) शोधण्याचं काम मानवी बुद्धीच्या पलिकडचं आहे. काळाचा प्रवास अखंडपणे चालूच असतो. काळाचं मोजमाप मात्र आपण स्वत:च्या सोयीनुसार करत असतो. काळाचे भूत-वर्तमान व भविष्य असे आपण तुकडे करतो. काळ जसजसा पुढे सरकत असतो तसा भविष्यकाळ वर्तमानातून भूतकाळात प्रवेश करीत असतो. ही क्रिया अखंडितपणे चालूच असते. काळाचे हे चक्र काल चालू होतं, आज चालू आहे आणि उद्याही चालूच राहणार आहे.

माणूस आपल्या सोयीसाठी आपल्या बुद्धीनुसार काळाचे सेकंद-मिनिटे-तास-दिवस-महिने-वर्ष असे भाग पाडून काळ मोजायचा प्रयत्न करतो. पण काळाला याचं भान कुठे असतं? तो आपला स्वत:च्या गतीनुसार चालूच राहणार आहे. कालपटलावर माणूस स्वत:च्या कर्तृत्वाचे ठसे उमटवीत असतो. काही ठसे लगेच पुसले जातात; काही दीर्घकाळ राहतात. पुन्हा नवे ठसे कालपटलावर उमटतात. ही क्रियादेखील सातत्याने चालूच असते.

विचारांचे असे अनेक कल्लोळ मनात उमटत असले तरी आपण त्यात जास्त गुरफटून न जाता एकमेकांना नववर्षानिमित्त शुभेच्छा द्याव्यात हेच बरं नव्हे का ? आम्हाला मात्र आज संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलीने 'विश्वात्मक देवा'- पाशी मागितलेल्या पसायदानाची तीव्रतेने आठवण होत आहे.

''दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो तें लाहो । प्राणि जात ।।''

- संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर महाराज अशी प्रार्थना करीत असतानाच -

''जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।''
''भूतां परस्परे पडो । मैत्र जीवांचे ।।''

- ही मनातील इच्छा व्यक्त करतात. नववर्षानिमित्त एकमेकांना शुभेच्छा देत असताना आपण देखील श्री ज्ञानेश्वर महाराजांचं स्मरण करून त्यांच्याच शब्दात परमेश्वराजवळ म्हणजेच 'विश्वात्मक देवा'जवळ प्रार्थना करू या.

**- क्रांतिसेन रामचंद्र आठवले,** पुणे
भ्रमणध्वनी : ९८६९९४१६९१

## मोठ्ठा फरक
### (बघा पटतंय का ?)

अमेरिकन आणि भारतीय स्त्रीमध्ये फरक काय ?

अमेरिकन पत्नी आपल्या पतीवर दोन वर्ष इतकं प्रेम करते की, त्याला सोडतच नाही. दोन वर्षात ती आपल्या प्रेमाचा कोटा पूर्ण करते आणि पतीला सोडून देते. मग 'नेक्स्ट'.

भारतीय स्त्री प्रेमाचा कोटा पूर्ण होऊ देतच नाही. त्यामुळे पुरुषाला 'नेक्स्ट'ची संधीच मिळत नाही. सकाळी प्रेम तर संध्याकाळी आदळआपट. अशाने प्रेमाचा कोटा कसा पूर्ण होणार? म्हणून भारतीय स्त्रीला प्रेमाचा कोटा पूर्ण करायला सात जन्म लागतात.

**- प्रभाकर गुपचूप,** पुणे

## चुकचुक

अंधारले सारे, निखळले तारे ।
धरतीची ओटी, परी भरली नाही ।।
लागले ग्रहण, पाहू नको बाई ।
सावलीत सूर्य, उभा राही ।।
उजाडेल आता, उठतील पक्षी ।
माझ्या मनी तर, काही नाही ।।
उलट्या घड्यावर, ओतावे पाणी ।
तसेच सारे, वाया जाई ।।
उरला काळोख, पहाटेची भूक ।
हावरी राही, हावरी राही ।।

**- सौ.कल्पना सुभाष कोठारे,**
सांताक्रुझ, मुंबई

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008
Licence to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month

## प्रतिक्रिया

'संवाद' चा डिसेंबरचा अंक मिळाला. त्यातील पान १४ वरील 'अजातशत्रू श्रेष्ठी' हा कै.सुरेश पतकी यांच्यावरील लेख वाचला. अत्यंत योग्य शब्दात श्री.पतकी यांचेबद्दलच्या आठवणींना उजाळा दिल्याबद्दल श्री.डी.आर.बेंद्रे यांची व तो लेख छापून सर्व सभासदांपर्यंत पोहोचवल्याबद्दल संपादक मंडळाची मी अत्यंत आभारी आहे. 'संवाद' पत्रिकेतून नेहमीच दर्जेदार लेख, अनुभव इ. वाचावयास मिळते. पूर्वी बँकेचे त्रैमासिक 'कलीग' घरी आल्यावर जितक्या आवडीने वाचत होते, तितक्याच आवडीने 'संवाद' ही वाचते. 'संवाद'मध्ये नेहमीच सर्वांगीण विषयांवरील उत्तम लेख, कविता, विनोद, जीवनाच्या वाटचालीतील निरनिराळ्या सुखदु:खांच्या अनुभवकथनावरील लेखांच्या समावेशाबरोबरच, सेवानिवृत्तांच्या प्रश्नांसंबंधी चाललेल्या असोसिएशनच्या लढ्याविषयींची माहितीदेखील असते. त्यामुळे सर्वजण 'संवाद'ची दरमहा आतुरतेने वाट पहात असतात. 'संवाद'च्या पुढील वाटचालीस शुभेच्छा.

- **सुमंगला सुरेश पतकी**, कोल्हापूर


# NEUTRINO
# THE NUTRITION CLUB

## INVITATION

You are most cordially invited for a

"Free Body Analysis & Check up"
Tests: Height, Weight, Body FAT, BMI, TSF, Metabolic Age & Visceral Fat

**Monday to Saturday**
**from 7 a.m. to 10 a.m.**

The Body Analysis will be conducted by using the latest
**Bio-Impedance Technology from Japan.**
Invest 15 min. to understand the status of your body.

**NEUTRINO-THE NUTRITION CLUB**
**"SIPL Digital Planet"**
2146, Sukhada Apartment, Opp.Hotel Kaveri,
Vijaynagar Colony, Sadashiv Peth, Pune - 30.
**Mandar : 9370324251**


**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

*If Undelivered Please Return to :*
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.